# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१८

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

**नरीमन पॉईट ते मालाड मार्वे मार्गापर्यंत काही भागात भराव टाकून रस्ता बांधणेबाबत**

**(१) २८८१ (२३-१२-२०१४). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबईच्या पश्चिम दिशेस नरीमन पॉईट ते मालाड मार्वे मार्गापर्यंत काही भागात भराव टाकून रस्ता बांधणे तर काही भागात पूल आणि उन्नत मार्ग, काही भागात बोगदे यांचा समावेश असलेला एकूण ३५.६ कि.मी. लांबीचा किनारा मुक्त मार्गाची शिफारस तत्कालीन महानगरपालिका आयुक्त, श्री.सुबोधकुमार यांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आलेल्या संयुक्त तांत्रिक समितीने शासनास सादर केला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकल्पांच्या प्रतिपूर्तीसंदर्भात केंद्र शासनाने सर्वतोपरी सहकार्य करण्याच्यादृष्टीने लोकप्रतिनिधी माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान मा.मुख्यमंत्री यांना निवेदन दिले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या निवेदनानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, केलेल्या कार्यवाहीचे स्वरुप काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०६-२०१८) :** (१) होय.

(२) ते (४) १) प्रकल्पाच्या प्रतिपूर्ती संदर्भात कोस्टल रोडसारखे महत्तम सार्वजनिक प्रकल्प राबविण्यास असलेल्या सीआरझेड तरतूदींचा अडसर दूर व्हावा म्हणून केंद्र शासनाच्या पर्यावरण व वन मंत्रालयाने दिनांक ३० डिसेंबर २०१५ रोजीच्या अधिसूचनेन्वये सीआरझेडच्या नियमामध्ये यापूर्वीच सुधारणा केलेली आहे.

२) सदर प्रकल्पास मुंबई हेरिटेज संवर्धन समितीने दिनांक २८.१०.२०१६ रोजी नाहरकत प्रमाणपत्र दिलेले आहे.

३) कोस्टल रोडची दक्षिणेकडील प्रिन्सेस फ्लायओव्हर ते वरळी(end of Sea Link) व उत्तरेकडील सी लिंकच्या बांद्रा येथील टोकापासून कांदिवली जंक्शन लिंक रोड पर्यंतच्या भाग अशी दोन भागामध्ये विभागणी करण्यात आलेली आहे. त्यामधील दक्षिणेकडील भागाबाबत

केंद्र शासनाच्या पर्यावरण व वन मंत्रालयाने दिनांक ११.०५.२०१७ रोजीचे पत्रान्वये मान्यता दिलेली आहे. कोस्टल रोडच्या सदर भागासंदर्भात निविदा प्रक्रिया महानगरपालिकेकडुन अंतिम टप्प्यामध्ये आहे.सदर कामास लवकरच सुरुवात होणार आहे.

---

## मुंबईतील पुरातन वास्तूंच्या सुरक्षेसाठी उपाययोजना सुचविण्यासाठी स्थापन केलेल्या उपसमितीने उपाययोजना सूचविल्या नसल्याबाबत

**(२) १९६६२ (३१-०७-२०१५). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंत्रालयाला तीन वर्षापूर्वी भीषण आग लागल्यानंतर मुंबई पुरातन वास्तू संवर्धन समितीच्या नेतृत्वाखाली मुंबईतील पुरातन वास्तूंच्या सुरक्षेसाठी उपाययोजना सुचविण्यासाठी एक उपसमितीची स्थापना केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तीन वर्षानंतर सदर समितीने अद्यापही मुंबईतील पुरातन वास्तुंच्या सुरक्षेसाठी कोणत्याच उपाययोजना सूचवल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०६-२०१८) :** (१) ते (३) हे खरे नाही. सदर बाबतीत मुंबई पुरातन वास्तु संवर्धन समितीच्या नेतृत्वाखाली कोणत्याही उपसमितीची स्थापना करण्यात आलेली नाही.

---

## मुंबई शहरामध्ये इमारत बांधकामाकरिता लागणाऱ्या विविध परवानग्यांबाबत

**(३) ४४५७२ (०७-०५-२०१६). श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरामध्ये इमारत बांधकामांना लागणाऱ्या विविध परवानग्यांची संख्या ११९ वरुन ५८ वर व या संबंधीची कार्यपध्दती यासह इतर प्रमाणपत्रे सुलभीकरण १ वर्षावरुन २ महिन्यावर आणण्याचा निर्णय मुंबई महानगरपालिकेने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई महानगरपालिकाच्या धर्तीवर राज्यातील सर्व महानगरपालिका व नगरपालिका यांची ही कार्यपध्दती निश्चित करुन सर्व माहिती ई-प्लॅटफार्मवर आणण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, इमारत बांधकामाच्या प्रस्तावाची छाननी सहाय्यक अभियंता स्तरावर पुर्ण करण्याचा निर्णय व आवश्यकतेनुसार चटईक्षेत्र निर्देशांक (एफएसआय) सवलती विषयक प्रस्ताव याबाबतची प्रक्रिया कार्यकारी अभियंता यांच्या स्तरावर सुरु करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, त्याची कारणे काय आहेत व यानुसार कार्यवाहीच्या अंमलबजावणी सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०६-२०१८)** : (१) होय.
(२) राज्यातील १० लक्ष वा त्यापेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या महानगरपालिकांना तसेच विशेष नियोजन प्राधिकरणांना बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या धर्तीवर ऑन लाईन इमारत परवाना प्रक्रिया अनुसरणेच्या सूचना देणेत आलेल्या आहेत.
(३) व (४) यासंदर्भात कमी व मध्यम जोखीम आधारित इमारत परवानगी मंजूरीच्या प्रक्रियेबाबत शासनाने बृहन्मुंबई महानगरपालिकेस महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १५४ अन्वये निदेश दिलेले आहेत. त्यानुसार परवानाधारक वास्तूविशारद/सर्वेक्षक यांना तात्पुरते(Provisional) परवाना मंजूरीचे अधिकार देणेत आलेले असून प्रभाग पातळीवरील कनिष्ठ स्तरावरील अधिकारी यांनी औपचारिक मान्यता तसेच प्रारंभ प्रमाणपत्र १० दिवसाचे मुदतीत देणेची तरतूद त्यामध्ये अंतर्भूत आहे.

---

## मौजे-कांदीवली (मुंबई) येथील सी.टी.एस.नं.१२८/ १ ते ९० या भुखंडावर ना.ज.क.धा. अंतर्गत अटी व शर्तींचे भंग केल्याबाबत

**(४) ६९२७८ (१६-१२-२०१६). श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे-कांदीवली (मुंबई) येथील स.न. १६३/सी.टी.एस.नं. १२८ अे/१ ते ९० या भूखंडावर झालेल्या नागरी जमीन कमाल धारणा (युएलसी) अंतर्गत अपर जिल्हाधिकारी, ना.ज.क.धा, मुंबई उपनगर जिल्हा, बांद्रे या कार्यालयातून शासन आदेश क्र. युएलसी १०९४/५७२४ युएलसी/ दिनांक २० ऑक्टोबर, १९८९ (एस आर ४२३/४.९.२०) या मूळ आदेशाच्या प्रतीची फक्त झेरॉक्स प्रत असून विकास आराखडयाची प्रत उपलब्ध नसल्याने सदर प्रतीची मागणी केल्यास प्रत दिली जात नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आदेशासोबत विकास आराखडयात संपूर्ण नकाशा अस्तित्वात नसतानाही मुंबई महानगरपालिकेने सदर विकास आराखडा कोणत्या आधारे मंजूर केला आहे,
(३) असल्यास, आराखडयात आजपर्यंत वेळीवेळी केलेले फेरफार/बदल बेकायदेशीर आहेत, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आले त्या अनुषंगाने शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०६-२०१८) :** (१) यासंदर्भात दिनांक २०.१०.८९ चे आदेश गृहनिर्माण विभागाने पारित केलेले असल्याचे जिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी (ना.क्षे.क.म), बृहन्मुंबई यांनी कळविलेले आहे. त्यांचे कार्यालयीन संचिकेमध्ये सदर आदेशाची छायांकित प्रत उपलब्ध आहे.

(२) महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या तरतूदीनुसार नियोजन प्राधिकरणाकडून त्यांच्या अखत्यारिमधील क्षेत्राचे विकास आराखडे तयार करुन शासनास मंजूरीसाठी सादर केले जातात. शासनाकडून त्यास मंजूरी दिली जाते.

विकास आराखडा तयार करताना प्रथमत: सर्वेक्षण करुन अस्तित्वात जमीन वापर नकाशा तयार केला जातो. त्यानंतर शहराची भविष्यामध्ये वाढणारी लोकसंख्या विचारात घेवून त्याप्रमाणे सोयी-सुविधा यांचे नियोजन करुन प्रस्तावित जमीन वापर नकाशा म्हणजे विकास आराखडा तयार केला जातो.

प्रश्नाधीन न.भू.क्र. १२८ अंतर्भूत असलेल्या प्रभाग क्षेत्राचा विकास आराखडा शासनाकडील दिनांक ४.५.१९९३ च्या अधिसूचनेन्वये मंजूर करणेत आलेला असून अंमलात आहे.

(३) ते (६) बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावली, १९९१ च्या विनियम ११(४) च्या तरतूदीस अधीन राहून जमीन मालकाच्या जागेत त्याच्या विनंतीनुसार आरक्षणाचे स्थानांतरण तसेच रस्त्याच्या आखणीमध्ये बदल करण्याचे अधिकार महापालिका आयुक्त यांना आहेत.

---

## राज्याच्या आंतरराष्ट्रीय वित्तीय सेवा केंद्राला (आयएफएससी) 'विशेष आर्थिक क्षेत्र' म्हणून ५० हेक्टरची अट शिथील करण्याबाबत

**(५) ७६०५८ (२०-०४-२०१७). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.नसीम खान (चांदिवली), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलेट ट्रेन स्थानकासाठी वांद्रे कुर्ला संकुलातील ०.९ हेक्टर एवढी जागा भूपृष्ठावर तर ४.५ हेक्टर इतकी जागा भूमिगत लागणार असून रेल्वेला एकदा जमीन दिल्यावर तेथे रेल्वे कायदा लागू होतो, त्यामुळे रेल्वे प्रकल्पालगतच्या जागेत बांधकाम करण्यावर कायदेशीर निर्बंध येत असून शासनाच्या महाराष्ट्र नगररचना कायदा एसआरटीपी त्या क्षेत्रासाठी लागू होत नाही, त्यामुळे बुलेट ट्रेनमुळे राज्याच्या आंतरराष्ट्रीय वित्तीय सेवा केंद्राला (आयएफएससी) 'विशेष आर्थिक क्षेत्र' म्हणून केंद्र शासनाने ५० हेक्टरची अट शिथील करावी या राज्य शासनाच्या मागणीस केंद्र शासनाने नकार दिल्यामुळे आयएफएससी केंद्र धोक्यात आल्याची बाब जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने अधिक चौकशी केली आहे काय.

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत त्यानुसार आयएफएससी प्रकल्प तडीस नेण्याच्या दृष्टीने शासनाने कोणते पर्याय निवडले आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०५-२०१८) :** (१) ते (३) विशेष आर्थिक क्षेत्रांच्या प्रस्तावाची छाननी करण्याकरिता गठीत असलेल्या उच्चाधिकार समितीच्या दिनांक १०.२.२०१७ रोजीच्या बैठकीमध्ये ठरल्याप्रमाणे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण हे बांद्रा-कुर्ला संकुल येथे इंटरनॅशनल फायनानन्शियल सर्विसेस सेंटर विशेष आर्थिक क्षेत्र स्थापन करणार आहे. सदरच्या विशेष आर्थिक क्षेत्रासाठी किमान ५० हेक्टर जमिनीची पूर्तता झाली आहे. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची स्वत:ची ५२.२८ हेक्टर जमीन आहे. प्रकल्पाची अंदाजित गुंतवणुक १२०१४.०० कोटी असून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण स्वत:च्या निधीतून करणार आहे. प्रकल्पासाठी लागणारी वीज व पाणी याची पूर्तता झालेली असल्याबाबत चर्चा झालेली असून सदर प्रस्ताव औपचारिक मान्यतेसाठी केंद्र शासनाकडे शिफारस करणेस मंजूरी देणेत आलेली आहे. त्यानुसार उद्योग, उर्जा व कामगार विभागाने दिनांक २२.२.२०१७ रोजीच्या पत्रान्वये सदर प्रस्ताव केंद्र शासनास सादर केलेला आहे. सदर प्रस्तावास केंद्र शासनाची मान्यता मिळालेनंतर राज्य शासनाकडून पुढील कार्यवाही संकल्पित आहे.

---

### मुंबई येथील इमारत क्र. १४५ एफ शिंदे चाळ, साने गुरुजी मार्ग, इमारतीच्या पुनर्बांधणीची योजना

**(६) ८४७९९ (२३-०८-२०१७). श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथील इमारत क्र. १४५ एफ शिंदे चाळ, साने गुरुजी मार्ग, इमारतीच्या पुनर्बांधणीची योजना व्यवहार्य होण्याच्या दृष्टीने लगतच्या करमणुकीच्या मैदानाच्या आरक्षण बदलाचा प्रस्ताव बृहन्मुंबई महानगरपालिकेद्वारे शासनास सादर केलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रस्तावावर शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०६-२०१८) :** (१) ते (३) बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून असा प्रस्ताव शासनास सादर झालेला आहे. सदर प्रस्ताव परिपूर्ण नसल्याने व प्रस्तावानुसार बाधित होणाऱ्या जमिन मालकांना वैयक्तीक नोटीसा देवून त्यांचे म्हणणे ऐकूण घेणेची प्रक्रिया महापालिकेने पार पाडलेली नसल्याने त्याबाबत त्यांना दिनांक २०.०९.२०१६ रोजीचे पत्रान्वये पूर्तता करणेस कळविलेले असून महानगरपालिकेकडून त्या संदर्भाने कार्यवाही सुरु आहे.

---

**दादर (मुंबई) येथील इंदू मिलच्या जागेवरील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाच्या कामाबाबत**

**(७) ८६२५८ (२३-०८-२०१७). डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील इंदू मिल परिसरात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे आंतरराष्ट्रीय ख्यातीचे स्मारक उभारण्याबाबत शासनाने निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर स्मारकासाठी लागणारी १२.५ एकर जमीन राज्य शासनाकडे हस्तांतरित करण्याबाबतची अधिसूचना केंद्र शासनाने दिनांक ५ जानेवारी, २०१७ रोजी निर्गमित करुन त्याबाबतच्या आदेशाची प्रत मा.केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्री यांनी दिनांक १८ मार्च, २०१७ रोजी वा त्या सुमारास मा.मुख्यमंत्री महोदयांकडे सुपूर्द केली असल्याने व त्याबाबतचे निवेदन मा.मुख्यमंत्री महोदयांनी विधानसभागृहात केले आहे, हे ही खरे आहे काय.

(३) असल्यास, सदर स्मारकांसाठी प्रत्यक्षात किती जमीन हस्तांतरित करण्यात आली आहे व किती एकर जमीनीवर स्मारक उभारण्यात येणार आहे,

(४) असल्यास, स्मारकाचे पुढील काम सुरु करण्याचे दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०५-२०१८) :** (१) होय.

(२) व (३) शासन नगरविकास विभागाकडून दिनांक २१.११.२०१६ रोजीच्या अधिसूचनेन्वये इंदू मिलच्या क्षेत्रापैकी सीआरझेड क्षेत्राचे बाहेरील क्षेत्र प्रस्तावित स्मारकासाठी आरक्षित करणेत आले. सीआरझेड क्षेत्राचे संदर्भात केंद्र शासनाच्या पर्यावरण, वन व वातावरणीय बदल मंत्रालयाने सीआरझेड अधिसूचना-२०११ मध्ये दिनांक २३.१२.२०१६ रोजीच्या अधिसूचनेन्वये सुधारणा केलेनंतर शासन नगरविकास विभागाकडून दिनांक ५.१.२०१७ रोजीच्या अधिसूचनेन्वये सीआरझेडने बाधित होणारे क्षेत्रही प्रस्तावित स्मारकासाठी आरक्षित करणेत आले. एकंदर इंदू मिलचे संपूर्ण क्षेत्र प्रस्तावित स्मारकासाठी आरक्षित झालेले आहे.

राष्ट्रीय वस्त्रोद्योग महामंडळाकडून दिनांक २५.३.२०१७ रोजी इंदू मिलच्या संपूर्ण जागेचा ४८४१४.८३ चौ.मी. क्षेत्राचा ताबा राज्य शासनास देणेत आलेला आहे. सदर मिळकत, मिळकतपत्रिकेवर महाराष्ट्र शासनाचे नांवे झालेली आहे. याबाबतचे निवेदन मा.मुख्यमंत्री महोदय यांनी विधानसभेमध्ये केलेले आहे.

(४) मा.मंत्री (सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य) यांच्या अध्यक्षतेखालील एकसदस्यीय समितीने स्मारकाच्या आराखडयाची संकल्पना अंतिम केलेली असून त्यास शासनाची तत्वत: मान्यता देणेत आलेली आहे. त्यानुसार अंतिम नकाशे तसेच अंदाजपत्रक तयार करुन निविदा मागविणेची कार्यवाही करणेबाबत महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

यांना दिनांक १३.४.२०१७ रोजीचे पत्रान्वये आदेश देणेत आलेले आहेत. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत निविदा मागविण्यात आलेल्या आहेत.

---

**राज्यातील खोती जमिनी पुन्हा ताब्यात घेण्याबाबत**

**(८) ९१६२६ (०४-०९-२०१७). श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात Salsette Estate (Land Revenue Exemption Abolition) Act, १९५१, च्या अन्वये राज्यातील खोती जमिनी शासकीय झाल्यानंतर राज्यातील खोती जमिनी सरकारी जमा झाल्याची कार्यवाही शासनाने केल्यानंतर संबधित जमिनधारकांनी मा.उच्च न्यायालयात दाखल केलेल्या सुट क्र.४८१/१९५३ व ८३१/१९५४ मध्ये झालेल्या समझोता करारा प्रमाणे (Consent Term) कायद्याच्या तरतुदीनुसार केलेल्या जमिनी पुन्हा भांडूप गाव, नाहर गाव, भांडूप इस्टेट (मुंबई उपनगरे) येथील खोतांच्या नावे शासनाने दाखल केल्यानंतर सदर जमिनीवरील झोपड्यांचे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणांतर्गत पुनर्विकास करण्याचे खोती जमिनधारकांशी संगनमत करुन त्यावर पुनर्वसन इमारतीचा प्रकल्प राबवून त्याचे बांधकाम पूर्ण होण्याची वेळ आल्यावर त्यावर खोती जमिनीधारकांनी आक्षेप घेतल्याने किती पुनर्वसनाची कामे सद्यःस्थितीत अपूर्णावस्थेत आहेत,

(२) असल्यास, खोती जमीन खोतदारांनी शासनाची परवानगी न घेता झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण अंतर्गत झोपडपट्यांचा पुनर्विकास करण्यास परस्पर खाजगी विकासकास दिल्यामुळे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने त्याला आक्षेप घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यामुळे शासनाच्या जमिनीचा अपहार होऊन शासनाचा महसूल बुडत असल्याने या प्रकरणी पुनर्विचार करुन सदर जमिनी पुन्हा ताब्यात घेण्याबाबत काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (१३-०६-२०१८) :** (१) प्रश्नांकित कारणांमुळे मुंबई उपनगरातील एस विभागांतर्गत भांडूपगांव, नाहूरगांव, भांडूप इस्टेट या भागातील खोती जमिनीवर झोपडपट्टी पुनर्वसन योजना अपूर्णावस्थेत राहिल्याचे किंवा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने स्थगिती आदेश दिल्याचे आढळून येत नसल्याचा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचा अहवाल आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कर्जत (जि.रायगड) तालुक्यातील कर्जत चौक या रस्त्यांची झालेली दुरवस्था**

**(९) ९५२०५ (३०-१२-२०१७). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.सुरेश लाड (कर्जत),**

**श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्जत तालुक्यातील (जि.रायगड) कर्जत चौक या रस्त्यांची दुरवस्था होऊन रस्त्यांमध्ये मोठ-मोठे खड्डे पडले असल्याने दिनांक १७ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त रस्त्याच्या दुरुस्तीसाठी एमएमआरडीएने मागील २ वर्षापूर्वी कोट्यवधी रुपये खर्च केले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी तसेच जनतेनी वारंवार तक्रारी करुनसुध्दा कोणतीच कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनूसार रस्याच्या कामात गैरव्यवहार करणा-या दोषी अधिका-यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०६-२०१८) :** (१) होय, अंशतः खरे आहे.

(२) कर्जत ते चौक व कर्जत ते हाळफाटा या २०.५४ कि. मी. यारस्त्याच्या रुंदीकरण व मजबूतीकरणसाठी एकूण रुपये ८४ कोटी इतक्या खर्चाचे काम माहे, डिसेंबर, २०१४ मध्ये मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने हाती घेतले होते. सदर काम एप्रिल, २०१५ मध्ये पूर्ण झाले या रस्त्याचा दोषदायित्वाचा कालावधी माहे एप्रिल, २०१७ मध्ये संपुष्टात आल्याने, सदर रस्ता एप्रिल, २०१७ रोजी सार्वजनिक बांधकाम विभागास हस्तांतरीत करण्यात आला आहे.

(३) सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत या रस्त्यावर तात्पुरती व तातडीने दुरुस्ती करण्याकरीता रु. २८.०० लक्ष किमतीच्या कामास व्दिवार्षिक देखभाल व दुरुस्ती (खड्डे भरणे) अंतर्गत मंजूरी देण्यात आली असून, पावसाळयामध्ये व पावसाळयानंतर सदर रस्त्यावरील खड्डे सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत भरण्यात आले असून, सद्य:स्थितीत सदर रस्त्यावरील वाहतूक सुरळीत सुरु आहे.

(४) व (५) रस्त्यांवर पडलेल्या खड्डयांची कारणमिंमासा शोधण्याकरीता व्हि.जे.टी.आय. या संस्थेची नेमणूक एमएमआरडीए मार्फत करण्यात आलेली आहे

---

### कांदिवली (प.) येथील शाळेच्या खोल्या वापराविना पडून असल्याबाबत

**(१०) ९६२५२ (३०-१२-२०१७). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कांदिवली (प.) (मुंबई) येथील आर.डी. विद्यामंदीर, के महावीर हायस्कुलच्या ट्रस्टींच्या बेजबाबदारपणामुळे विकासकाने शाळेसाठी बांधून दिलेल्या पत्र्याच्या खोल्या वापराविना पडून असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे विद्यार्थ्यांचे शिक्षण धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विकासक आणी ट्रस्टी या दोघांच्या वादामुळे येथील झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पही प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने या प्रकरणात हस्तक्षेप करुन येथील एसआरए योजनेला गती देण्याबाबत व सदर शाळेच्या वर्गखोल्या विदयार्थ्यांसाठी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (१३-०६-२०१८) :** (१) होय. हे खरे आहे. विकासकांनी तात्पुरते स्वरुपात शाळेसाठी संक्रमण शिबीर उपलब्ध केलेले आहे. तथापि, शाळेचे व्यवस्थापन सदरहू जागेचा वापर करीत नसल्याचा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचा अहवाल आहे.

(२) हे खरे नाही. महावीर एज्युकेशन वेल्फेअर सोसायटी यांनी आर.डी. विद्यामंदिर प्राथमिक शाळा या नावाने इंग्रजी माध्यमाची अनधिकृत शाळा सुरु केली आहे. या शाळेच्या इयत्ता १ ली ते ४ थी च्या वर्गांना, महानगरपालिकेची कोणतीही परवानगी नाही, तसेच शासनाचीही मान्यता नाही. त्यामुळे महानगरपालिका, शिक्षण विभाग यांनी दि.२१/११/२०१७ रोजी सदरहू शाळा ८ दिवसांच्या आत तात्काळ बंद करुन विद्यार्थ्यांचे समायोजन नजीकच्या शाळेमध्ये करण्याबाबत सुचनापत्र बजावलेले आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) सक्षम प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, आर/दक्षिण विभाग, मुंबई महानगरपालिका यांनी सदरहू झोपडीधारकांविरुध्द महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा,निर्मूलन व पुनर्वसन) अधिनियम १९७१ चे कलम ३३ व ३८ नुसार दि.१०/१०/२०१७ रोजी सदरहू झोपडी ७ दिवसात रिक्त करण्यास आदेशीत केलेले आहे. सदर बाब सक्षम प्राधिकारी यांच्या स्तरावर चालू असल्याचा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचा अहवाल आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई शहरात झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणांतर्गत ओशिवरा येथील कदम चाळ पुनर्वसनामध्ये १८ अपात्र झोपडीधारकांना घरे देण्यात आल्याबाबत**

**(११) ९७०३१ (३०-१२-२०१७). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरात झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणांतर्गत ओशिवरा येथील कदम चाळ पुनर्वसनामध्ये १८ अपात्र झोपडीधारकांना घरे देण्यात आल्याची बाब दिनांक ८ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी संबंधित प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील प्रतिनियुक्तीवर असलेल्या उप-जिल्हाधिकारी, तहसीलदारसह अन्य अधिकारी सहभागी असल्याची बाब समोर आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती प्रशासकीय वा दंडात्मक कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (१३-०६-२०१८) :** (१) हे खरे नाही. मौजे ओशिवरा, तालुका अंधेरी येथील कदम चाळ सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या मूळ परिशिष्ट-२ मध्ये अपात्र असलेल्या झोपडीधारकांपैकी १८ झोपडीधारक महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सु.नि. व पु.) अधिनियम १९७१ मधील कलम ३५(१) अन्वये अपिलामध्ये पात्र झाल्याने सदर पात्र झोपडीधारकांना झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून दि.२१.८.२०१६ रोजी सदनिका वाटप करण्यात आल्या आहेत.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे शहर आणि परिसरात मागील आठ महिन्यांत ८ ते १० हजार झाडांची संख्या कमी झाल्याबाबत

**(१२) १००४४९ (०१-०१-२०१८). प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहर आणि परिसरात मागील आठ महिन्यांत ८ ते १० हजार झाडांची संख्या कमी झाल्याचे माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उद्यान विभागाने प्रतिबंधात्मक आदेश देऊन संबधितांवर फौजदारी कारवाई करण्याचा इशारा देऊनही वृक्ष समितीची परवानगी न घेता पुणे महानगरपालिका आयुक्तांच्या अधिकारात वृक्ष तोड केल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बेकायदेशीर झाडांची तोड करणाऱ्या दोषी व्यक्तींवर व संबधित अधिकाऱ्यांवर शासन स्तरावर काय कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०६-२०१८) :** (१) व (२) पुणे शहर व परिसरातील शहरातील वृक्षांचा विस्तार कमी करणे, वृक्ष पूर्णपणे काढणे, बांधकाम पूर्णत्व व ना-हरकत प्रमाणपत्र देणे या बाबी वृक्ष अधिकारी, पुणे महानगरपालिका यांच्या मार्फत करण्यात येतात.

याकरीता मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार वृक्षतज्ञ समिती गठित केलेल आहे. त्यानुसार वेळोवेळी वृक्षतोड व अन्य तद्संबंधीत बाबींसाठी नियंत्रण ठेवण्यात येते.

अनाधिकृत वृक्षतोड होऊ नये याकरीता पुणे महानगरपालिकडून वेळोवेळी दक्षता घेण्यात येते.

शासन निर्णय दिनांक ११.७.२०१७ नुसार २५ वृक्ष संख्येपेक्षा कमी वृक्ष असणाऱ्या प्रकरणामध्ये महापालिका आयुक्तांना वृक्षतोडीसाठी परवानगी देण्याचे अधिकार सुपुर्त करण्यात आलेले आहेत.

पुणे महानगरपालिकेकडून अवैध वृक्षतोड होऊ नये या अनुषंगाने वेळोवेळी आढावा घेण्यात येत असून दोषी व्यक्तींविरुध्द कायद्यातील तरतूदीस अनुसरुन कारवाई करण्यात येते.

अवैध वृक्षतोडीबाबत एकूण ५३८ प्रकरणी गुन्हे दाखल केल्याने न्यायालयात दावे दाखल झाले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गृहनिर्माण विभागाने घेतलेल्या आढाव्यात ४२ विकासकांनी पुनर्वसन योजनेतील इमारती बांधण्याबाबत दुर्लक्ष केल्याबाबत**

**(१३) १०३५१८ (३०-१२-२०१७). श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.जयकुमार गोरे (माण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), अ‍ॅड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) झोपडपट्टी पुनर्वसन योजनांचा माहे जानेवारी, २०१६ ते जून, २०१७ या कालावधीत गृहनिर्माण विभागाने घेतलेल्या आढाव्यात ७० टक्के झोपडीधारकांची संमती असतानाही ४२ विकासकांनी पुनर्वसन योजनेतील इमारती बांधण्यास दुर्लक्ष केल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती दोषी आढळून आलेल्या विकासकांची नावे काय आहेत व त्यांच्यावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (१३-०६-२०१८) :** (१) व (२) मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांनी प्रलंबित योजनांचा व्यापक आढावा घेतला असून त्यानुसार महाराष्ट्र झोपडपट्टी (सु.नि.व पु.) अधिनियम, १९७१ चे कलम १३(२) अन्वये एकूण १२२ झो.पु. योजनांच्या विकासकांना नोटीस बजावून खुलासा मागविण्यात आला होता. त्यापैकी समाधानकारक खुलासा सादर न केलेल्या विकासकाविरुध्द सुनावणीची प्रक्रिया पूर्ण करण्यात येऊन माहे जून, २०१७ अखेर महाराष्ट्र झोपडपट्टी (सु.नि.व पु.) अधिनियम, १९७१ चे कलम १३(२) अन्वये एस.आर.ए. प्रकल्प रखडविणाऱ्या ४२ विकासकांच्या नियुक्त्या रद्द करण्यात आल्या आहेत. त्यानंतर जुलै, २०१७ ते नोव्हेंबर, २०१७ या कालावधीत १२ विकासकांच्या नियुक्त्या रद्द करण्यात आल्यामुळे एकूण ५४ विकासकांची नियुक्ती रद्द करण्यात आली आहे.

| अ.क्र | संस्था | विकासक |
|---|---|---|
| १ | अष्टविनायक एसआरए स.गृ.सं. | एस.एस.व्ही. रिअलटर्स |

| | | |
|---|---|---|
| २ | जनता एसआरए स.गृ.सं | मे.एस.के. कॉर्पोरेशन |
| ३ | संजीवनी एसआरए स.गृ.सं | मे.वैभव लक्ष्मी बिल्डर्स अँन्ड डेव्हलपर्स. |
| ४ | न्यू साफल्य एसआरए स.गृ.सं | मे.अमीकृपा लॅन्ड डेव्हलपर्स |
| ५ | गणेश नगर एसआरए स.गृ.सं | मे.धनश्री डेव्हलपर्स |
| ६ | जयहिंद गांधीनगर एसआरए स.गृ.सं | मे.हरी ओम डेव्हलपर्स/मे.विजय कमल प्रॉपर्टीज प्रा.लि. |
| ७ | श्री.गणेशनिवास एसआरए स.गृ.सं. | मे. ड्रिम डेव्हलपर्स |
| ८ | संजीवनी व इतर एसआरए स.गृ.सं. | मे.एस.एस.व्ही डेव्हलपर्स |
| ९ | गणेशनगर एसआरए स.गृ.सं. | मे. साईसिध्दी डेव्हलपर्स |
| १० | श्री.अष्टविनायक एसआरए स.गृ.सं | मे.गॅलक्सी इंटरप्रायजेस |
| ११ | वक्रतुंड एसआरए स.गृ.सं | मे. आयडीएल बिल्डर्स अँन्ड डेव्हलपर्स |
| १२ | समता एसआरए स.गृ.सं. | वैधही आकार हौसिंग प्रा.लि. |
| १३ | अण्णा- कासमनगर सह.गृ.संस्था | मे. के.एस. चमणकर एंटरप्राईजेस |
| १४ | साईधाम एसआरए स.गृ.सं | मे. एस.एस.व्ही. डेव्हलपर्स |
| १५ | डिवाईन मशी स.गृ.सं | कुंजन मेहता बिल्डर्स अँन्ड डेव्हलपर्स |
| १६ | गणेशवाडी एसआरए स.गृ.सं | मे.अंकीता बिल्डर्स अँन्ड डेव्हलपर्स |
| १७ | हनुमान नगर एसआरए स.गृ.सं | मे.कांची बिल्डर्स अँन्ड डेव्हलपर्स |
| १८ | शिवाजी नगर एसआरए स.गृ.सं | मे.विनायक रिअल्टर्स |
| १९ | श्री. सिध्दीविनायक सह.गृह.संस्था | यश बिल्डर्स अँन्ड डेव्हलपर्स |
| २० | भाई बंदरकर फिशरमेन्स सह. गृह. संस्था | मे. मॅझसन बिल्डर्स डेव्हलपर्स |
| २१ | मौर्या एसआरए सह.गृह.संस्था | मे.म्हात्रे आणि असोसिएटस् |
| २२ | समता सह.गृह.संस्था | मे.डिसन्स इन्व्हेस्टमेंट अँन्ड फायनान्स प्रा.लि. |
| २३ | अमनएकता सह.गृह.संस्था | मे.डिसन्स इन्व्हेस्टमेंट अँन्ड फायनान्स प्रा.लि |
| २४ | मोतीलाल सह.गृह.संस्था | पंक्ती हाऊ. प्रा.लि. |
| २५ | एकविरा विहार सह.गृह.संस्था | मे. राम चंद्रा जी पाटील |
| २६ | शिवनेरी सह.गृह.संस्था | मे.सृष्टी असोशिएटस् बिल्डर्स अँन्ड डेव्हलपर्स |
| २७ | रामनारायण शिवनंदन सह.गृह.संस्था | मे.उमाइया डेव्हलपर्स |
| २८ | आउट पोस्ट एसआरए सह.गृह.संस्था | मे. पिरॅमिड डेव्हलपर्स |
| २९ | रामबाग हनुमान नगर सह.गृह.संस्था | युनायटेड मॅक्स कंन्स्ट्रक्शन लि. |
| ३० | पारस उपाध्याय सह.गृह.संस्था | मे.राज रीयल्टर्स |
| ३१ | श्रमजीवी (एसआरए) सह.गृह.संस्था | मे.सृष्टीराज इंटरप्राईजेस |
| ३२ | किशोर किरण सह.गृह.संस्था | मे.स्कायलार्क बिल्डकॉर्न प्रा.लि. |
| ३३ | हरी ओम सह.गृह.संस्था | मे.अमिकृपा लॅन्ड डेव्हलपर्स |
| ३४ | गणेश नगर सीएचएस | मे.लकडावाला डेव्हलपर्स |
| ३५ | बी.सी.अँन्ड ओ (पार्ट) ब्लॉक, व्ही.पी नगर सीएचएस | मे.मिहिर ठक्कर अँन्ड असोसिएटस् |
| ३६ | जय भवानी व इतर १४ सह.गृह.संस्था | मे.जी.एम.एस. वास्तु आणि बिल्डर्स प्रा.लि. |
| ३७ | फ्लायओव्हर सह.गृह.संस्था | मे. लकी डेव्हलपर्स |

| | | |
|---|---|---|
| ३८ | न्यू नवरत्न वक्रतुंड सह.गृह.संस्था | मे.माऊली साई डेव्हलपर्स प्रा.लि. |
| ३९ | श्री.साईकृपा सह.गृह.संस्था | मे.परेश वालीया ॲन्ड डेव्हलपर्स |
| ४० | आदर्श सह.गृह.संस्था | मे.कुणाल बिल्डर्स ॲन्ड डेव्हलपर्स |
| ४१ | जनता कल्याणकारी सह.गृह.संस्था | मे.सिध्दार्थ बिल्डर्स ॲन्ड डेव्हलपर्स |
| ४२ | नवशक्तीनगर सह.गृह.संस्था | मे.बीजेय रिअल्टर्स प्रा.लि. |
| ४३ | साहिल सह.गृह.संस्था | मे.फ्रिस्कॉन इन्फ्रास्ट्रक्चर |
| ४४ | चैतन्य सह.गृह.संस्था | मे.एन.एस.टी रिअल्टर्स प्रा.लि |
| ४५ | न्यू शांतिसेवा सह.गृह.संस्था | मे.सिध्दार्थ बिल्डर्स ॲन्ड डेव्हलपर्स |
| ४६ | ग्रीन नशेमन सह.गृह.संस्था | मे.पोलस्टार इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. |
| ४७ | सन रे सह.गृह.संस्था | मे.मिडास डेव्हलपर्स प्रा.लि. |
| ४८ | आनंद नगर सह.गृह.संस्था | मे.अभिनी डेव्हलपर्स |
| ४९ | शुध्दोधन सह.गृह.संस्था | मे.ॲमिस्थिट कन्स्ट्रक्शन आणि इन्फ्रास्ट्रक्चर कं. |
| ५० | श्री.सम्राट एसआरए सह.गृह.संस्था | मे.ॲमिस्थिट कन्स्ट्रक्शन आणि इन्फ्रास्ट्रक्चर कं. |
| ५१ | एकता एसआरए सह.गृह.संस्था | मे.फॅटकॅट इन्फ्रा प्रा.लि. |
| ५२ | शिव शंकर (एसआरए) सह.गृह.संस्था | मे.अनिकेत बिल्डर्स ॲन्ड डेव्हलपर्स |
| ५३ | न्यू महर्षि (एसआरए) सह. गृह. संस्था | मन्थन बिल्डर्स ॲन्ड डेव्हलपर्स |
| ५४ | मुकुंद नगर (एसआरए) सह.गृह.संस्था | मे.पॅंटागॉन प्रमो प्रा.लि. |

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईच्या ताडदेव येथील एम.पी.मील कंपाऊंड झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत झालेला गैरव्यवहार**

**(१४) १०३५२२ (३०-१२-२०१७). श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.जयकुमार गोरे (माण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.सुनिल केदार (सावनेर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईच्या एम.पी. मिल कंपाऊंडच्या सर्वे नं.७२५ पार्ट १ ते ६ मध्ये जायफळवाडी आणि जनता ह्या हिल हे तीन एसआरए प्रकल्पातील १८०० झोपड्यातील १६५० रहिवाश्यांना सात मजल्याच्या ९ इमारतीमध्ये २२५ चौ.फूटांची घरे देण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एसआरए योजनेत विकासक झोपडपट्टीवासीयांसाठी जितकी जागा मोफत बांधून देतो त्याच्या तूलनेत मिळणारी जागा खुल्या बाजारात विकण्याची त्याला परवानगी मिळते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, एमपी मिल कंपाऊंड च्या विकासकाने जुन्या नियमानुसार प्रत्येक फ्लॉट २२५ चौ.फू. क्षेत्रफळाचा बांधल्याने त्याला त्यानुसार एफ.एस.आय. मिळणार असताना सन २००६

निर्णयानुसार प्रत्येक रहिवाशाला २२५ चौ.फूटा ऐवजी २६९ चौ.फूट जागा देण्याचा नियम झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, असे असताना विकासकाला नव्या नियमानुसार अधिकचा एफएसआय मिळविण्यासाठी रहिवाशांची अधिक क्षेत्रफळाची मागणी नसताना रहिवाशांच्या वाटणीची जागा वडाळा येथील प्रकल्प बांधण्यासाठी वापरण्याचा पर्याय गृहनिर्माण विभागाने डीसी रुलकडे लक्ष वेधून सदरचा प्रस्ताव नाकारला असतानाही प्रस्ताव मंजूर केल्याने ३००० करोड रुपयांचा गैरव्यवहार झाल्याची बाब माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (१३-०६-२०१८) :** (१) सदर अभिन्यासामध्ये ०९ पुनर्वसन घटकाच्या इमारतीमध्ये एकूण २३३४ झोपडपट्टी धारकांपैकी २२१३ पात्र झोपडपट्टी धारकांना २२५ चौ.फूटच्या सदनिका वितरीत करण्यात आल्या आहेत.
(२) विकास नियंत्रण नियमावली १९९१ च्या नियम ३३(१०) मधील परिशिष्ट-४ च्या खंडीका क्र.३.३ नुसार मुंबई शहर क्षेत्रामध्ये १० चौ.मी. पुनर्वसन घटकाकरीता ७.५ चौ.मी. विक्री घटक बांधण्याकरीता विकासकास परवानगी देण्यात येते. त्यानुसार विकासकास परवानग्या देण्यात आलेल्या आहेत, असा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचा अहवाल आहे.
(३) नगर विकास विभागाच्या दि.१६.०४.२००८ च्या अधिसूचनेनुसार झोपडपट्टीवासियांच्या पुनर्वसन इमारत बांधकाम चटई क्षेत्रफळ २२५ चौ.फूट वरुन २६९ चौ.फूट करण्यास सन २००९ मध्ये परवानगी देण्यात आली आहे.
(४) हे खरे नाही. मात्र या प्रकरणी मा.लोकआयुक्त यांच्याकडे चौकशी सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## शिवाजीनगर (पुणे) परिसरातील अनधिकृत बांधकामावर कारवाई करण्याचे प्रशासकीय लेखी आदेश तब्बल वीस वर्षांपासून जाणीवपूर्वक दडविल्याबाबत

**(१५) १०५१०५ (१२-०४-२०१८). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिवाजीनगर (पुणे) परिसरातील अनधिकृत बांधकामावर कारवाई करण्याचे प्रशासकीय लेखी आदेश तब्बल वीस वर्षांपासून जाणीवपूर्वक दडविल्याची गंभीर बाब माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, पुणे येथील आपटे रस्त्यावरील अनधिकृत बांधकामासंदर्भात प्रभाकर वझे या उच्चशिक्षित ज्येष्ठ नागरिकाने महानगरपालिकेकडे तक्रार नोंदविल्या नंतर मागील वीस वर्षांपासून त्यांचा कारवाई संदर्भात महानगरपालिका प्रशासनाकडे पाठपुरावा सुरु असतांना हे

बांधकाम अद्यापही जैसे-थे असून संबंधित बांधकामावर कारवाई करण्याचे आदेशाकडे दुर्लक्ष करण्यात येत असल्याचे त्यांच्याकडे असलेल्या कागदपत्रांवरून पुढे येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यामुळे अनधिकृत बांधकामाची पाठराखण करण्यात विधी विभागाचा संशयास्पद कारभार कागदपत्रांवरून निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०६-२०१८) :** (१) व २) प्रस्तुत प्रकरणातील संबंधिताना बांधकामावर कारवाई करणेसाठी कलम ४७८ (१) अन्वये नोटीस बजाविणेत आली आहेत.

सदर प्रकरणातील एकाच कुटुंबातील मालकी हक्का संदर्भात तक्रारी असून याबाबत महानगरपालिका आयुक्त यांचे स्तरावर सुनावणी होऊन तक्रारदार यांना वेळोवेळी कळविणेत आले आहे.

तसेच प्रस्तुत प्रकरणी मा.दिवाणी न्यायालय पुणे मालकी हक्क संदर्भात दावा क्र. ४७४/२०११,१४५७/२०१२ व १८३/२०१५ व ९८१/२०१५ दावे सुरु आहेत. तसेच १८३/२०१५ या दाव्यामध्ये स्थगिती आदेश आहे.

(३) व (४) मा.दिवाणी न्यायालयाच्या स्थगिती आदेशामुळे सदर मिळकतीवर कारवाई करण्यास प्रतिबंध असल्याने कारवाई करता आलेली नाही. यापूर्वी सदर प्रकरणी मा.उच्च न्यायालयात सदरची बाब न्यायप्रविष्ट होती. त्यातील सर्व दावे हे नुकतेच मे.भागवत कोर्ट सि.जज्ज सि.डी. यांच्याकडे वर्ग झालेले असल्याने त्यांनी सदर प्रकरणी तडजोडीने संबधित दाव्यातील विषय मिटविण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यांना यश आलेले नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोरपणा (जि.चंद्रपूर) नगरपंचायत अंतर्गत असलेल्या पशु संवर्धन जिल्हा परिषद विभागाच्या शासकीय मालमत्तेचे नुकसान झाल्याबाबत**

**(१६) १०५४४४ (१२-०४-२०१८). श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्री.कृष्णा गजबे (आरमोरी), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरपणा (जि.चंद्रपूर) नगरपंचायत अंतर्गत असलेल्या पशु संवर्धन जिल्हा परिषद विभागाच्या शासकीय मालमत्ता जमीनदोस्त करतांना कोरपणा नगरपंचायत प्रशासनाने संबधित विभागाची कोणतीही मंजुरी घेतलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शासकीय मालमत्तेला जमीनदोस्त करून रस्ता तयार करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर शासकीय मालमत्तेचे नुकसान केल्या प्रकरणी तसेच शासकीय पशु चिकित्सालय, संरक्षण भिंत, वृक्षतोड करून नुकसान करणाऱ्या संबंधित प्रशासकीय अधिकारी व कंत्राटदार यांची सविस्तर चौकशी करण्यात आली आहे, ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०६-२०१८) :** (१), (२), (३), (४) व (५) • नगरपंचायत कोरपणा यांनी दि.१४.११.२०१७ रोजी ठराव क्र.२० अन्वये, नगरपंचायत क्षेत्रातील वार्ड क्र.१२ भावराव कारेकर ते आठवडी बाजारापर्यंत जाणाऱ्या रस्त्यामध्ये असलेले पशु संवर्धन दवाखान्याचे तार कंपाऊड काढून रस्ता काढण्यात यावा. तसेच, याबाबतची माहिती संबंधित कार्यालयाला कळविण्यात यावी, असा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला होता. तथापि, शासकीय मालमत्ता पाडण्यासंदर्भात कोणतीही लेखी आदेश नगरपंचायतकडून देण्यात आले नव्हते.
• दरम्यान, नगरपंचायत कार्यालयाकडे पत्रव्यवहार तपासला असता त्यामध्ये कार्यालय अधिक्षक यांनी मुख्याधिकारी यांची मान्यता न घेता त्यांच्या स्तरावर जिल्हा पशुसंवर्धन यांच्याकडे पत्रव्यवहार केल्याचे दिसून आल्याने त्यांना मुख्याधिकारी, कोरपणा नगरपंचायत यांनी कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. तसेच, याबाबत संबंधित कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याची शिफारस नगरपंचायत, कोरपणा यांनी जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांच्याकडे केली आहे.

---

## कोल्हापूर महानगरपालिका आरोग्य विभागाने रस्ते सफाईसाठी दोन स्विपिंग मशीन (सफाई मशीन) घेतल्याबाबत

**(१७) १०५७२८ (१८-०४-२०१८). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर महानगरपालिका आरोग्य विभागाने रस्ते सफाईसाठी २ वर्षांच्या भाडेकरारावर दोन स्विपिंग मशीन (सफाई मशीन) घेतल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मशिनच्या दोन वर्षांच्या भाड्यापोटी प्रशासन रु.२.५० कोटी देत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सफाईसाठी भाडेकरारावर घेतलेल्या दोन मशीनपैकी एकच मशीन प्रत्यक्षात असल्याने गैरव्यहार होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर गैरव्यवहार करून कोल्हापूर महानगरपालिका प्रशासनाची फसवणूक करणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करणेत येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०६-२०१८) :** (१) कोल्हापूर महानगरपालिका आरोग्य विभागाने २ वर्षांच्या भाडे तत्वावर रस्ते सफाईसाठी स्थायीसमितीच्या मंजूरी अन्वये २ स्विपिंग मशीन लावल्या आहेत, हे खरे आहे.

(२) रस्ते सफाईच्या कामाकरीता २ वर्षाच्या कालावधीसाठी भाडे तत्वावर रु.२.७५ कोटीचे अंदाजपत्रक तयार केले असून निविदा प्रक्रियेद्वारे वाटाघाटीनंतर प्रती कि.मी. रु.५२० या दरास महानगरपालिकेच्या स्थायी समितीची मंजूरी प्राप्त असून त्यान्वये कामाचा ठेका देण्यात आला आहे.

(३) व (४) रस्ते सफाईच्या कामाकरीता लावण्यात आलेल्या २ स्विपिंग मशीनच्या सहाय्याने सफाईचे कामकाज सुरु असल्याचे कोल्हापूर महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## तानसा जलवाहिनी लगतच्या झोपडीधारकांना २२५ चौ.फुटांची घरे न देता २६९ चौ.फुटांची घरे देण्याबाबत

**(१८) १०५७५० (०६-०४-२०१८). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेने तानसा जलवाहिनी लगतच्या झोपडीधारकांना बाधित ठरवून २२५ चौ.फुटांची घरे न देता प्रकल्पबाधितांना सन २००८ मध्ये घेतलेल्या निर्णयानुसार कायद्याने किमान २६९ चौ.फुटांची घरे देण्यात यावीत अन्यथा आमरण उपोषण करुन आंदोलन करण्याचा इशारा लोकप्रतिनिधींनी दिनांक २८ डिसेंबर, २०१७ रोजी तसेच वारंवार दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रश्नी झोपडीधारकांच्या मागण्यांचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०६-२०१८) :** (१) याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी बृहन्मुंबई महानगरपालिकेस दिनांक ३०.१२.२०१७ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.

(२) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण/ एमएमआरडीए/खाजगी विकासक/ एसपीपीएल यांच्याकडून वेळोवेळी तत्कालीन धोरणानुसार २२५ चौ. फु. क्षेत्रफळाच्या २५,७२८ व २६९ चौ. फु. क्षेत्रफळाच्या १४७३ इतक्या पीएपी सदनिका बृहन्मुंबई महानगरपालिकेस प्राप्त झाल्या आहेत.

तानसा जलवाहिनी लगतच्या बाधितांची संख्या साधारणत: १६,५८८ इतकी असून, त्यापैकी ५८६२ प्रकल्पबाधितांना २२५ चौ.फु. क्षेत्रफळाच्या सदनिका माहुल येथे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत.

तानसा जलवाहिनीलगतच्या बाधितांची संख्या मोठया प्रमाणात महानगरपालिकेस प्राप्त झालेल्या २२५ चौ.फु. क्षेत्रफळाच्या सदनिका तानसा जलवाहिनी लगतच्या बाधितांना उपलब्ध करुन देण्याचा निर्णय घेण्यात आला असून, तानसा जलवाहिनीलगतच्या बाधितांना मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार विहित कालावधीत स्थलांतरीत करण्यात येणार आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौ.राणीसावरगाव (ता.गंगाखेड जि.परभणी) येथील पोलीस ठाण्याचा प्रस्तावास मान्यता देणेबाबत**

**(१९) १०६२४७ (१२-०४-२०१८). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौ.राणीसावरगाव (ता.गंगाखेड जि.परभणी) येथील पोलीस ठाण्याचा प्रस्ताव गत सहा वर्षांपासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पोलीस ठाणे कार्यान्वीत करण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०६-२०१८) :** (१) व (२) पोलीस अधीक्षक, परभणी यांच्या आस्थापनेवरील पिंपळदरी पोलीस ठाणे व पालम पोलीस ठाणे यांचे विभाजन करुन नवीन राणीसावरगाव पोलीस ठाणे निर्माण करण्याची बाब राज्य पोलीस दलात निर्माण करावयाच्या ६१,४९४ पदांच्या पदनिर्मितीच्या चौथ्या टप्प्यामध्ये प्रस्तावित करण्यात आली आहे. सद्यस्थितीत राज्य पोलीस दलातील पदनिर्मितीचा दुसरा टप्पा विचाराधीन आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मलकापूर पांग्रा (ता.सिंदखेड राजा, जि.बुलढाणा) येथे पोलीस चौकी उभारण्याच्या मागणीबाबत**

**(२०) १०६९२२ (११-०४-२०१८). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मलकापूर पांग्रा (ता.सिंदखेड राजा, जि.बुलढाणा) येथे चोरट्यांचा प्रमाण वाढले असुन येथे पोलीस चौकी उभारण्याची मागणी ग्रामस्थांनी संबधित अधिका-यांकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या पोलीस चौकीकरिता ग्रामपंचायत जागा देण्यास तयार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०६-२०१८)** : (१), (२) व (३) मलकापूर पांग्रा (ता.सिंदखेड राजा, जि.बुलढाणा) येथील ग्रामस्थांनी पोलीस अधीक्षक, बुलढाणा यांच्याकडे मलकापूर पांग्रा येथे पोलीस चौकी उभारणेबाबत निवेदन सादर केले आहे. सदर निवेदनामध्ये पोलीस चौकीकरीता जागा उलब्ध करुन देणेबाबतचा उल्लेख करण्यात आलेला नाही तसेच संबंधित ग्रामपंचायतीनेही जागेबाबत काही कळविलेले नाही.तथापि मलकापूर पांग्रा येथील ग्रामस्थांनी पोलीस चौकीबाबत केलेल्या मागणीच्या अनुषंगाने पोलीस अधीक्षक, बुलढाणा यांच्यामार्फत योग्य ती कार्यवाही करण्यात येते आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर महानगरपालिकेतील संगणक पासवर्ड चोरुन कर कमी करणाऱ्या अधिकाऱ्यांवर बडतर्फीची कारवाई करण्याबाबत

**(२१) १०७०२३ (१९-०४-२०१८). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर महानगरपालिकेच्या सहायक आयुक्ताच्या संगणकाचा पासवर्ड चोरुन सक्करदरा अग्निशामक केंद्राचे प्रभारी यांनी संपत्ती कराचे कमी करुन महानगरपालिकेच्या महसुलाच्या अपहार केल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणामध्ये महानगरपालिकेचे अधिकारी समाविष्ट असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नागपूर शहरातील अनेक विभागीय कार्यालयामध्ये संपत्ती कराच्या महसुलाचा अधिकाऱ्यांमार्फत अपहार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०६-२०१८)** : (१) चौकशीअंती महानगरपालिका नागपूर अंतर्गत कनिष्ठ निरीक्षक यांचा “युजर आयडी” व पासवर्डचा वापर करुन मालमत्ता कराच्या एका प्रकरणात संगणकावर फेरफार करुन, कराची रक्कम कमी करण्यात आल्याची बाब निदर्शनास आलेली असल्याचे, आयुक्त, नागपूर महानगरपालिका यांच्या अहवालात नमूद करण्यात आले आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.
(४) व (५) प्रस्तुत प्रकरणात अप्रत्यक्षरित्या संबंधीत असलेल्या दोन अधिका-यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५६ अंतर्गत कार्यवाही करुन निलंबित करण्यात आलेले आहे.

---

**अकोले नगरपंचायतीस (जि.अहमदनगर) पायाभूत नागरी सुविधा तसेचे रस्ते, गटारी, पाणीपुरवठा पाईप लाईनची पुनर्बांधणी करणेसाठी निधी मिळण्याबाबत**

**(२२) १०७०८३ (१८-०४-२०१८). श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोले नगरपंचायतीस (जि.अहमदनगर) पायाभूत नागरी सुविधा तसेच रस्ते, गटारी, पाणीपुरवठा पाईपलाईनची पुनर्बांधणी करण्यासाठी १५ कोटी रुपयांचा निधी मिळणेची मागणी अकोले येथील लोकप्रतिनिधीनी दिनांक २१ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्या सुमारास केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०६-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) शासन निर्णय क्र.सरस्ता-२०१८/प्र.क्र.१५/नवि-१६ दिनांक २५ जानेवारी,२०१८ अन्वये रु.२० लक्ष इतके रस्ता अनुदान अकोले नगरपंचायतीस वितरीत करण्यात आले आहे. तसेच शासन निर्णय क्र.ननपं-२०१८/प्र.क्र.१७/नवि-१६ दिनांक २५ जानेवारी,२०१८ अन्वये नव्याने स्थापन केलेल्या नगरपंचायतीना नागरी सुविधा पुरविण्यासाठी सहाय्य या योजनेअंतर्गत रु.२५ लक्ष इतका निधी वितरीत करण्यात आल आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील सांताकूझ (पूर्व), शिवाजी नगर येथील ३० वर्षे प्रलंबित असलेली पुनर्विकास योजना**

**(२३) १०७५९९ (०३-०४-२०१८). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील सांताकूझ (पूर्व) शिवाजी नगर येथील ३० वर्षे प्रलंबित असलेली पुनर्विकास योजना २ वर्षात खात्रीने पूर्ण करण्यासाठी झोपडपट्टी पूनर्वसन प्राधिकरणाने जाहिरात देवून सक्षम विकासाची नेमणूक करावी असे आदेश दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, न्यायालयाने प्राधिकरणाला दिलेल्या आदेशात प्रमुख कोणकोणत्या बाबींचा उल्लेख करण्यात आला आहे,
(३) असल्यास, सदरहू आदेशाची विनाविलंब अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (१३-०६-२०१८) :** (१) होय. हे खरे आहे.
(२) मा.सर्वोच्च न्यायालयातील याचिका क्र.१८१२१/ २०१७ मध्ये दि.०४.०१.२०१८ रोजीच्या आदेशा नुसार खालील मुद्दे/अटी बंधनकारक आहेत.

१) विकासक नेमणूकीबाबतची आवश्यक कार्यवाही विहित वेळेत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत करण्यात यावी.

२) सदर योजनेच्या पुनर्वसन इमारतीचे बांधकाम २ वर्षात पूर्ण करावयाचे आहे.

३) विकासकास २०० करोड बँक गॅरंटी २ वर्षात पुनर्वसन घटक पूर्ण करावयाचे हमी म्हणून झो.पु. प्राधिकरणास जमा करणे आवश्यक राहील.

(३) मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशान्वये दि.२३.०१.२०१८ रोजी निविदा सूचना (Tender Notice) व दि.०१.०२.२०१८ रोजी निविदा (Tender Document) झो.पु.प्राधिकरणाच्या अधिकृत संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील अनधिकृत होर्डिंग्ज हटविण्याबाबत**

**(२४) १०७८८५ (१८-०४-२०१८). श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील अनधिकृत होर्डिंग्ज हटविण्याबाबत उच्च न्यायालयाने आदेश देवूनही अनेक महानगरपालिकांनी या आदेशाची अद्याप अंमलबजावणी केली नसल्याचे दिनांक १२ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाकडून कोणतेच प्रयत्न केले गेले नसल्याने राज्यातील अनधिकृत होर्डिंग्ज २३ फेब्रुवारीपर्यंत हटविण्याचे आदेश उच्च न्यायालयाने दिलेले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यानूसार आतापर्यंत किती महानगरपालिकांकडून अनधिकृत होर्डिंग्ज हटविण्यात आले आहेत,
(४) असल्यास, महानगरपालिकांकडून होर्डिंग्ज हटविण्यास विलंब होत असल्यास त्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०६-२०१८) :** (१), (२), (३) व (४) अनधिकृत होर्डिंग्ज, बॅनर व तत्सम बाबींवर कारवाई करण्याच्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालयाने दि. ३१/१/२०१७ रोजी विस्तृत आदेश दिलेले आहेत.

त्यास अनुसरुन सर्व महानगरपालिकांना व संबंधीत कार्यालयांना राज्य शासनामार्फत वेळोवेळी सूचना दिलेल्या असून सर्व महानगरपालिका व संबंधीत कार्यालयांनी मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल मा. उच्च न्यायालयासमोर वेळोवेळी सादर करण्यात आलेला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### पन्हाळा (जि.कोल्हापूर) गिरीस्थान नगरपरिषदेत मुख्याधिकाऱ्याचे पद रिक्त असल्याबाबत

**(२५) १०८०५४ (१८-०४-२०१८). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पन्हाळा (जि.कोल्हापूर) हे एक ऐतिहासिक ठिकाण असून दरवर्षी येथे लाखो पर्यटक भेट देत असतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पन्हाळा गिरीस्थान नगरपरिषदेत मुख्याधिकाऱ्याचे पद रिक्त आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नगरपरिषदेला कार्यालय प्रमुख असणारा मुख्याधिकारी पदाचा अधिकारी नसल्याने दैनंदिन कामकाजात अनेक अडचणी येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, पन्हाळा (जि.कोल्हापूर) गिरीस्थान नगरपरिषदेत मुख्याधिकाऱ्याचे रिक्त पद तातडीने भरण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०६-२०१८) :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) सदर पदाचा अतिरिक्त कार्यभार तहसिलदार, पन्हाळा यांचेकडे सोपविण्यात आलेला आहे. तसेच, तहसिलदार पन्हाळा हे मुख्यालयी राहत असल्याने नगरपरिषदेचे दैनंदिन कामकाज सुरळीतपणे सुरू आहे.

(४) पन्हाळा गिरीस्थान नगरपरिषदेतील मुख्याधिकारी पद भरण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### कोल्हापूर महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण विभागामार्फत शहरातील महानगरपालिका शाळांमध्ये बेंच खरेदी करण्याचा प्रस्ताव

**(२६) १०८६७५ (१२-०४-२०१८). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण विभागामार्फत शहरातील महानगरपालिका शाळांमध्ये सुमारे ५६ लाख रुपयांचे बेंच खरेदी करण्याचा प्रस्ताव करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रशासनाने सदर बेंच कळंबा मध्यवर्ती कारागृहातून खरेदी करण्याचा प्रस्ताव सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आजतागायत सदर बेंच खरेदी करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर बेंच खरेदीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०६-२०१८) :** (१) कोल्हापूर महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण विभागामार्फत शहरातील महानगरपालिका शाळांकरीता रु. ४९.२४ लक्ष रुपयांचा बेंच खरेदीचा प्रस्ताव कोल्हापूर महानगरपालिकेकडे प्राप्त झाला आहे, हे खरे आहे.

(२) कोल्हापूर महानगरपालिका प्रशासनाने सदर बेंच खरेदीचा सुधारीत प्रस्ताव मध्यवर्ती कारागृह, कळंबा यांच्याकडून मागविला आहे, हे खरे आहे.

(३) सन २०१७ मध्ये मान्यता मिळाल्यानुसार महानगरपालिकांच्या शाळांकरीता बेंचपुरवठा संदर्भात पुरवठादाराने मार्च, २०१८ मध्ये बेंच पुरवठा करण्यास नकार दिल्याने बेंच खरेदी होऊ शकलेली नाही, असे कोल्हापूर महानगरपालिका यांनी कळविले आहे.

(४) कोल्हापूर महानगरपालिकेच्या शाळांकरीता मागविण्यात आलेल्या रु.४९.२४ लक्षच्या सुधारीत दरपत्रक/स्पेसिफिकेशन्स नुसार फेर प्रस्ताव स्थायी समितीच्या मान्यतेकरीता कोल्हापूर महानगरपालिकास्तरावर कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील मागासवर्गीय अधिकारी-कर्मचा-यांच्या पदोन्नतीतील आरक्षण रद्द करण्याच्या निर्णयाबाबत

**(२७) १०९१०७ (२१-०४-२०१८). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मागासवर्गीय अधिकारी-कर्मचा-यांच्या पदोन्नतीतील आरक्षण रद्द करण्याचा मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयावर पुनर्विचार करावा का या मुद्द्यावर मा.सर्वोच्च न्यायालयाच्या घटना पीठाचा निर्णय प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, असे असतानाच सामान्य प्रशासन विभागाने मागासवर्गीय अधिकारी व कर्मचारी यांना पदावनत करण्याचा आदेश जारी केला असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन सदर आदेश रद्द करण्यासोबतच सदर आदेश जारी करणा-या अधिका-यांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०५-२०१८) :** (१) होय.
(२), (३) व (४) मागासवर्गीय अधिकारी/कर्मचारी यांना पदावनत करण्याचा कोणताही आदेश सामान्य प्रशासन विभागाकडून निर्गमित करण्यात आलेला नाही. त्यामुळे संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांवर कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

---

**मालेगांव (ता.जि.नाशिक) महानगरपालिका हद्दीत नवीन बसस्थानकाजवळील उड्डाणपुलाच्या कामाबाबत**

**(२८) १०९५३६ (१९-०४-२०१८). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मालेगांव (ता.जि.नाशिक) महानगरपालिका हद्दीत नवीन बसस्थानकाजवळ उड्डाणपुलाचे काम महाराष्ट्र सुवर्ण जयंती अंतर्गत मंजूर झाले असून उक्त कामाची निविदा प्रक्रीया पुर्ण झालेली असून मक्तेदार यांनी कार्यादेश देऊन बराच कालावधी झालेला असून सदरचे काम सुरु करण्यात आले नसल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली असता मक्तेदारास काम सुरु करणेसाठी संबंधित महानगरपालिका बांधकाम अभियंता यांचेकडून रुपरेषा मिळालेली नसुन तसेच पी.एम.सी कडून स्टील डिझाईननींग देण्यात आलेला नसल्याने पोल शिफिटींगचे प्राकलन तयार करण्यात आलेले नाही त्यामुळे नागरिकांची गैरसोय होत असल्याने स्थानिक लोकप्रतिनिधीनी आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त काम लवकरात लवकर पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०६-२०१८) :** (१) • महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत मालेगाव शहरात रु.२१.७२२५ कोटी निधीचा उड्डानपुल मंजूर आहे.
• उड्डानपुल कामासंदर्भातील निविदाप्रक्रियेअंती सप्टेंबर, २०१७ मध्ये कार्यादेश देण्यात आले आहेत.

• ठेकेदारांने नोव्हेंबर, २०१७ मध्ये कामाचे बारचार्ट सादर केले असून महानगरपालिकेकडून डिसेंबर, २०१७ मध्ये कामाची रुपरेषा ठेकेदारास देण्यात आली आहे.

(२) • प्रकल्पाचे नकाशे व आराखडे माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये ठेकेदारास उपलब्ध केल्याचे मालेगाव महानगरपालिकेने कळविले आहे.

• लोकप्रतिनिधींकडून अदोंलनाची लेखी सूचना प्राप्त झाली असून अदोंलनापासून परावृत करण्याचे अनुषंगाने संबंधितांना पत्रव्यवहार करण्यात येत असल्याचा अहवाल मालेगाव महानगरपालिकेने सादर केला आहे.

(३) व (४) • प्रकल्पाच्या कामासंदर्भात पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे -

अ) उड्डानपुलाच्या कॉलमचे लाईन आऊट देऊन ट्रायल पिट घेण्यात आले असून सर्व्हिस रोडचे काम अंतिम टप्प्यात आहे.

आ) विद्युत वाहिन्या भूमिगत करणे, रस्त्यालगतच्या मालमत्तांची मोजणी, राज्य परिवहन मंडळाच्या बसेसेचे मार्गात बदल करण्याच्या अनुषंगाने संबंधितांबरोबर पत्रव्यवहार व बैठका घेण्यात येत असल्याचा अहवाल मालेगाव महानगरपालिकेने सादर केला आहे.

इ) उड्डानपुलाच्या कामात अडथळा ठरणारी झाडे तोडण्याचा प्रस्ताव वृक्ष प्राधिकरण समितीकडे सादर करण्यात आला आहे.

---

**नागपूर महानगरपालिकेस विशेष अनुदान देण्याबाबत**

**(२९) १०९५९० (१२-०४-२०१८). श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर महानगरपालिकेला दर महिन्याला आवश्यक खर्चासाठी ८५ कोटी रुपयांची आवश्यकता असून सध्या महानगरपालिकेच्या तिजोरीत ६० ते ६५ कोटींचाच महसूल जमा होत असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाकडून नागपूर महानगरपालिकेस विशेष अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०६-२०१८) :**(१) सन २०१७-१८ मध्ये नागपूर महानगरपालिकेस महापालिकेच्या निव्वळ उत्पन्नापोटी एकूण ११०३.०१ कोटी प्राप्त झालेली असून, त्याची दरमहा सरासरी रु.९१.९१ कोटी इतकी येत आहे.

याशिवाय स्थानिक संस्था कर / वस्तू व सेवाकर सहाय्यक अनुदानापोटी रु.४२६.९५ कोटी इतका महसूल शासनाकडून प्राप्त झालेला आहे.

(२) व (३) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमानुसार, महानगरपालिकांनी आर्थिक स्वयंपूर्णतेच्या दृष्टीने स्वत:चे उत्पन्नाचे स्त्रोत स्वत: निर्माण करुन, त्याची कार्यक्षमपणे अंमलबजावणीच्या आधारे वसुली करुन, महापालिका आर्थिकदृष्टया सक्षम करणे आवश्यक आहे.

असे असले तरी, सन २०१७-२०१८ मध्ये एकूण रु.२८०.०२ कोटी इतकी रक्कम शासनाकडून नागपूर महानगरपालिका हद्दीतील विकास कामांसाठी वितरीत करण्यात आलेली आहे.

---

**डहाणू (जि.ठाणे) नगरपरिषद क्षेत्रातील मस्जीद जवळील तलावाचे काम निकृष्ट दार्जचे झाल्याबाबत**

**(३०) ११०११७ (१९-०४-२०१८). श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डहाणू (जि.ठाणे) नगरपरिषद क्षेत्रातील मस्जीद जवळील तलावाचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे झाल्याचे दिनांक ०५ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बांधकामा प्रकरणी शाखा अभियंता व ठेकेदार जबाबदार आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानूसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०६-२०१८) :** (१), (२) व (३) डहाणू नगरपरिषद क्षेत्रातील मस्जीद जवळील तलावाचे बांधकाम नियमोचित मानांकानुसार झाले असून कामाची गुण नियंत्रण चाचणी त्रयस्थ लेखापरिक्षकाकडून केली असल्याचे नगरपरिषदेच्या अहवालात नमूद करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अहमदनगर (जि.अहमदनगर) महानगरपालिकेतील मुलभूत सोयीसुविधा योजनेंतर्गतची कामे अपूर्णावस्थेत असल्याबाबत**

**(३१) ११०१५१ (१८-०४-२०१८). श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर (जि.अहमदनगर) महानगरपालिकेला मुलभूत सोयीसुविधा योजनेंतर्गत विकास कामासाठी सन २०१३-१४ मध्ये ५ कोटी ४० लक्ष्य रक्कम देण्यात आली होती पण त्यातील काही हिस्सा न दिल्याने काही कामे अर्धवट स्वरुपात बंद पडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कामासाठी निधी वर्ग करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या आहेत काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०६-२०१८) :** (१) हे खरे नाही.

दिनांक २ जानेवारी,२०१४ च्या शासन निर्णयान्वये रु.२,७५४०,०००/- व दिनांक १५ फेब्रुवारी,२०१४ च्या शासन निर्णयान्वये रु.२,६८,६०,०००/- असे एकुण रु.५ कोटी ४४ लक्ष इतके अनुदान वितरीत झाले आहे. म्हणजेच मंजुर अनुदानातील कोणताही हिस्सा राखीव ठेवलेला नाही. संपुर्ण अनुदान वितरीत आहे.

(२) संपूर्ण निधी वितरीत असल्याने कार्यवाही अपेक्षित नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**एमएमआरडीए व सिडकोच्या माध्यमातून रायगड-ठाणे जिल्हयात**
**सुरु असलेल्या मेट्रो रेल्वेच्या प्रकल्पाबाबत**

**(३२) ११०१८६ (१२-०४-२०१८). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एमएमआरडीए व सिडकोच्या माध्यमातून रायगड-ठाणे जिल्हयात मेट्रो रेल्वेचा सध्या सुरु असलेल्या प्रकल्पाचा लाभ दहिसर मोरी, कल्याण फाटामार्गे दिवा, डोंबिवली ते कल्याणपर्यंत सुरु करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मागणीसंदर्भात शासनाने निर्णय घेतला आहे काय, त्याचे स्वरुप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०६-२०१८) :** (१) होय.

(२) व (३) कल्याण-डोंबिवली या शहरांतील वाढती लोकसंख्या व आजूबाजूचा होणारा विकास, विशेष नियोजन प्राधिकरण असलेल्या २७ गावांचा विकास आराखडा, कल्याण विकास केंद्र व नैना (NAINA) चे क्षेत्र तसेच कल्याण-डोंबिवली ही शहरे नवी मुंबई या शहराला जोडण्याची निकड लक्षात घेता, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने मेट्रो मार्ग-५ (ठाणे- भिवंडी-कल्याण) हा मेट्रो मार्ग विस्तारित करुन कल्याण ते तळोजा (डोंबिवली मार्गे) प्रस्तावित केला आहे. सदर मार्गाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी मेसर्स दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड यांची सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात आली असून सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम प्रगतीपथावर असून माहे ऑगस्ट, २०१८ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे. कल्याण फाटा, दहिसर मोरी इ. परिसरातील नागरिकांना सदर प्रस्तावित मेट्रोचा नक्कीच फायदा होणार आहे.

---

**कांजुरमार्ग पूर्व (मुंबई) येथील आरकेड अर्थ या गृह प्रकल्पाच्या विकासकाने**
**विनापरवाना खोदकाम केल्याबाबत**

**(३३) ११०५१५ (१९-०४-२०१८). श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महानगरपालिकेच्या प्रचलित नियमानुसार पावसाळयात गृहविकास प्रकल्पाचे खोदकाम करता येत नाही असे असतांनाही मुंबईमधील कांजुर मार्ग पूर्व येथील आरकेड अर्थ या गृह प्रकल्पाच्या विकासकाने गृह प्रकल्पालगत असलेल्या आकाशदीप चाळ झोपडपट्टीमध्ये अंतर न ठेवता पावसाळयात खोदकाम केल्याने दिनांक २५ जून, २०१७ रोजी जमीन खचून मोठा अपघात झाला व त्यात काही झोपडया कोसळल्या आणि काही झोपडयाच्या भिंतीना तडे जावून मोठी वित्त हानी झाल्याने सदर विकासकाविरूध्द कारवाई करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी केली असल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पावसाळयात परवानगी नसतांना आरकेड अर्थ या गृह प्रकल्पाचे खोदकाम करणा-या विकासकाविरूध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, पावसाळयात खोदकाम करणा-या विकासकास पाठीशी घालणा-या महानगरपालिकेच्या संबधित अधिका-यांविरूध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०६-२०१८) :** (१) दिनांक २५.०६.२०१७ रोजीच्या मुसळधार पावसामुळे भूखंडाच्या उत्तर-पूर्व दिशेकडील संरक्षण भिंतीचा काही भाग कोसळला होता. त्यामुळे लगतच्या घरे/झोपड्यांना तडा/धोका निर्माण झाला होता ही वस्तुस्थिती आहे.

तसेच स्थानिक लोकप्रतिनीधींनी आरकेड अर्थ गृह प्रकल्पाच्या विकासकाविरुध्द कारवाई करण्याची मागणी महानगरपालिकेकडे केली.

(२) व (३) सदर विकासकाने तळघराचे खोदकाम माहे ऑक्टोंबर, २०१६ ते मे, २०१७ या कालावधीत पूर्ण केले होते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वैशिष्ट्यपूर्ण योजनेंतर्गत सन २०१७-१८ या वित्तीय वर्षात दौंड नगरपरिषदेच्या प्रस्तावित कामांना रु. ४.०० कोटी अनुदान नगरपरिषदेस मंजूर करून मिळणेबाबत

**(३४) ११०७३६ (१८-०४-२०१८). श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वैशिष्ट्यपूर्ण योजनेंतर्गत सन २०१७-१८ या वित्तीय वर्षात दौंड नगरपरिषदेच्या प्रस्तावित कामांना रु. ४.०० कोटी अनुदान मिळणेबाबत मागणी स्थानिक लोकप्रतीनिधिनी दिनांक ०८ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास केली आहे, हे खरे आहे काय.

(२) असल्यास, उक्त अनुदान दौंड नगरपरिषदेस मिळणेबाबत शासनस्तरावर काय कार्यवाही करण्यात येत आहे वा येणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०६-२०१८) :** (१) होय हे खरे आहे.

(२) दिनांक २६ मार्च,२०१८ च्या शासन निर्णयान्वये वैशिष्टयपूर्ण योजनेअंतर्गत रु.२ कोटी इतका निधी दौंड नगरपरिषदेस वितरीत करण्यात आलेला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सिंदी रेल्वे (जि.वर्धा) येथील नगरपरिषदेच्या पाचही शाळांना गैस सिलेंडर पुरविण्याबाबत**

**(३५) ११०८२४ (१८-०४-२०१८). श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंदी रेल्वे (जि.वर्धा) येथील नगरपरिषदेच्या पाचही शाळांत खिचडी चुलीवर शिजवली जात असल्याने येथील महिलांचे आरोग्य धोक्यात आल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धुरामुळे महिलांना श्वसनाचे विविध आजार होत असूनही त्यांना शासन उज्ज्वला योजनेअंतर्गत अनुदानावर गॅस सिलिंडरचे वाटप करण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तातडीने या शाळांना अनुदानावर गॅस सिलिंडर देण्याबाबत शासन कोणती कार्यवाही करीत आहे वा करणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०६-२०१८) :** (१), (२), (३) व (४) सिंदी रेल्वे, नगरपरिषदेतील ५ शाळांमध्ये खिचडी चुलीवर शिजविली जाते, हे खरे आहे. परंतु, खिचडी शिजवणाऱ्या महिलांचे आरोग्य धोक्यात आल्याचे आढळून आलेले नाही किंवा त्याबाबत नगरपरिषदेकडे तक्रार प्राप्त झालेली नाही.

दरम्यान नगरपरिषदेकडून ठराव घेऊन सदर शाळांना गॅस सिलेंडर पुरविण्याबाबतची कार्यवाही करण्यात येत असल्याचे नगरपरिषदेने कळविले आहे.

---

**नागपूर शहरातील सायबरटेक कंपनीने करवाढीबाबत चुकीची नोंदी केल्याबाबत**

**(३६) ११०८७३ (१८-०४-२०१८). श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमर काळे (आर्वी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरातील सायबरटेक कंपनीने मालमत्तेचा चुकीचा सर्व्हे करून करवाढीबाबत चुकीची नोंदी केल्यामुळे शहरातील हजारो नागरिकांना दामदुप्पट तर कुठे तिप्पट पट्टीने कर लावून बिल पाठविल्यामूळे हजारो नागरिकांमध्ये भितीचे व संतापाचे वातारवण निर्माण झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या सर्व प्रकरणी सायबरटेक कंपनीचे अधिकारी व कर्मचारी तसेच महानगरपालिकेचे कर आकारणी अधिकारी जबाबदार आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या सर्व प्रकरणांची शासनाने उच्च स्तरीय अधिकाऱ्यांमार्फत चौकशी केली आहे काय व त्याचा तपशिल काय आहे,

(४) असल्यास, या गंभीर प्रकरणी शासनाने संबधितांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०६-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे प्रकरण ८ मधील कराधान नियम क्र.९ नुसार आकारणी पुस्तक तयार करुन व कराधान नियम क्र.१३,१४ व १५ मधील तरतुदीनुसार, मालमत्तेच्या बांधकामाचा प्रकार, क्षेत्रफळ, प्रयोजन, इमारतीचे वय इ. प्रकाराची अत्याधुनिक तंत्रज्ञानाद्वारे माहिती संकलित करुन व त्याची पुर्नतपासणी करुन, मालमत्ता कराची आकारणी केली जात असल्याचे, आयुक्त, नागपूर महानगरपालिका यांच्या अहवालात नमूद करण्यात आलेले आहे.

---

**कामगार संख्या ३०० पेक्षा कमी असलेल्या आस्थापना बंद करण्यासाठी राज्य शासनाची परवानगी घेणे बंधनकारक राहणार नाही असा शासनाच्या विचाराधीन असलेला प्रस्ताव**

**(३७) १११०४४ (१२-०४-२०१८). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात औद्योगिक विवाद अधिनियम १९४७ प्रमाणे ज्या आस्थापनेत १०० पेक्षा कामगार संख्या कमी आहे ती आस्थापना बंद करण्यासाठी राज्य सरकारची परवानगी लागत नाही तसेच १०० पेक्षा जास्त पण ३०० पेक्षा कमी कामगार संख्या असलेल्या आस्थापना बंद करण्यासाठी मालकाला राज्य सरकारची परवानगी घ्यावी लागते अशी तरतूद करण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तरतुदीमधे बदल करून ३०० पेक्षा कमी कामगार संख्या असलेल्या आस्थापना बंद करण्यासाठी राज्य सरकारची परवानगी घेण्याची जरुरी राहणार नाही असा बदल करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (१३-०६-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे आहे.
(३) औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७ मध्ये प्रस्तावित करण्यात आलेल्या सुधारणांच्या अनुषंगाने कामगारांवर बेरोजगारीची वेळ येवू नये किंवा त्यांच्यावर अन्याय होवू नये म्हणून संबंधित कामगार संघटना यांचे समवेत प्रत्यक्ष चर्चा करून व त्यांचे मत विचारात घेऊन पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे. त्यामुळे यासंदर्भात शासन स्तरावर अद्याप कोणताही निर्णय घेण्यात आलेला नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पंढरपूर (ता.पंढरपूर, जि.सोलापूर) शहरातील व उपनगरातील मल:निस्सारण कामांसाठी भुयारी गटार योजना टप्पा क्र.३ अंतर्गत निधी मिळण्याबाबत**

**(३८) १११२०८ (१२-०४-२०१८). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पंढरपूर (ता.पंढरपूर, जि.सोलापूर) शहरातील व उपनगरातील सांडपाणी मल:निस्सारण आदी कामांसाठी भुयारी गटार योजना टप्पा क्र.३ अंतर्गत सुमारे ६५ कोटी रूपये निधी देणार असल्याचे दिनांक २१ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने अद्यापही याबाबत पंढरपूर नगरपालिका प्रशासन यांना निधी मंजूरीचे आदेश किंवा प्रत्यक्ष निधी दिल्याचे आढळून येत नसल्यामुळे प्रकल्पाचे काम अपूर्णावस्थेत असल्याचेही निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पंढरपूर नगरपालिका प्रशासन यांना उपरोक्त योजनेचा टप्पा पूर्ण करणेसाठी शासनाने ६५ कोटी रूपये निधी तातडीने देणेसाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०६-२०१८) :** (१), (२) व (३) • पंढरपूर शहरातील सांडपाणी मल:निस्सारण इत्यादी कामांसाठी भुयारी गटारी योजना टप्पा क्र.३ अंतर्गत महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थ्यान महाअभियान योजनेच्या कामास दि.०७.०२.२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये रु.५९.७५ कोटी इतका निधी मंजूर करण्यात आला आहे. त्यापैकी दि.२३.०२.२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये पहिल्या हप्त्यात रु.१६.७६१ कोटी इतका निधी उपलब्ध करुन दिला आहे.
• त्यानुसार पंढरपूर नगरपरिषदेकडून निविदा प्रसिद्ध करुन दि.११.०४.२०१८ रोजी मे. खिलारी इन्फ्रा. प्रा. लि. मुंबई यांना कार्यादेश देण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**लांजा (जि.रत्नगिरी) नगरपंचायत हद्दीत १७ प्रभागांमध्ये खड्डे बुजविण्यासाठी नेमलेल्या ठेकेदाराकडून अतिशय निकृष्ट दर्जाची कामे झाल्याबाबत**

**(३९) १११३६१ (१९-०४-२०१८). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लांजा (जि.रत्नगिरी) नगरपंचायत हददीतील शहरामध्ये १७ प्रभागांमध्ये पावसाळयात पडलेले खड्डे बुजविण्यासाठी नेमलेल्या ठेकेदाराकडून अतिशय निकृष्ट दर्जाचर कामे झाल्याचे नुकतेच माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त निकृष्ट दर्जाच्या कामाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तदनुसार दोषी ठेकेदाराविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०६-२०१८) :** (१) अशा आशयाची बातमी स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द झाली असल्याचे नगरपरिषदेने कळविले आहे.
(२) नगरपरिषदेकडून प्राप्त अहावालानुसार नगरपरिषद हद्दीतील खड्डे जांभा खडीने भरणेकरीता अंदाजपत्रकात सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मान्यतेने व विशेष सर्व साधारण सभेच्या मान्यतेने मंजुरी देण्यात आली आहे. सदर कामाची तांत्रीक तपासणी नगरपंचायत अभियंता कडून करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**इचलकरंजी येथील नगरपरिषदेच्या इंदिरा गांधी मेमोरियल हॉस्पीटल मधील ५४ कर्मचाऱ्यांच्या सेवा कायम करण्याबाबतचा प्रस्ताव**

**(४०) १११५८९ (०३-०४-२०१८). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इचलकरंजी येथील नगरपरिषदेच्या इंदिरा गांधी मेमोरियल हॉस्पीटल शासनाकडे वर्ग झाल्यानंतर ५४ कर्मचाऱ्यांच्या इचलकरंजी नगरपरिषदेने कायम केलेल्या सेवेस नगरविकास विभागाची मंजुरी नसल्यामुळे आरोग्य विभागाकडे समावेशनाची प्रक्रिया प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मा.नगरविकास राज्यमंत्री यांनी दिनांक २५ मार्च, २०१७ रोजी झालेल्या बैठकीत सदर ५४ कर्मचाऱ्यांची सेवा कायम करण्याबाबत प्रस्तावास मंजुरी देणेसंदर्भात निर्देश दिलेले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर कर्मचाऱ्यांची सेवा कायम करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०६-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) यासंदर्भात मा.राज्यमंत्री (नगर विकास) यांनी दि. २५.०३.२०१७ रोजीच्या बैठकीमध्ये, नगरपरिषद संचालनालय, मुंबई यांच्याकडून अभिप्राय प्राप्त करुन घेऊन प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिले.

(३) व (४) यासंदर्भात नगरपरिषद संचालनालयाकडून शासनास प्रस्ताव प्राप्त झाला असून प्रस्तावाची छाननी करण्यात येत आहे.

---

**अकोला महानगरपालिका प्रशासनाने बेकायदेशीरपणे ठराव करुन मालमत्तेवर सुधारीत व वाढीव दराने मालमत्ता कर लावल्याबाबत**

**(४१) १११७०७ (१९-०४-२०१८). श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला महानगरपालिका प्रशासनाने दिनांक ३ एप्रिल, २०१७ रोजी बेकायदेशीरपणे ठराव करुन महानगरपालिका क्षेत्रातील संपूर्ण मालमत्तेवर सुधारीत व वाढीव दराने मालमत्ता कर लावण्यात आल्याच्या तक्रारी प्राप्ती झाल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बेकायदेशीरपणे लावण्यात आलेला मालमत्ता कर कमी करण्याबाबत सर्वच लोकप्रतिनिधींनी प्रशासनाकडे तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या अन्यायकारक मालमत्ता कर वाढ रद्द करण्याबाबत अथवा कमी करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०६-२०१८) :** (१) होय. हे खरे आहे.

(२) नाही. हे खरे नाही.

(३) व (४) अकोला महानगरपालिका सर्वसाधारण सभा ठराव क्र.०५ दिनांक ०३/०४/२०१७ अन्वये मंजुरीनंतर आणि रितसर विहीत प्रक्रियेनंतर अकोला महानगरपालिका हद्दीतील मालमत्तांना, जवळपास १५ वर्षानंतर (मालमत्ता बांधकाम प्रकार, बांधकामाचे आयुष्य, प्रयोजन, बांधकामाचे क्षेत्रफळ, बांधकामाचे स्थान इ. बाबीच्या आधारे) सुधारित मालमत्ता कराची आकारणी करण्यात आलेली होती.

परंतु, याबाबत प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने, महानगरपालिकेने विचाराअंती सर्वसाधारण सभा ठराव क्र.०६ दिनांक १९/०८/२०१७ अन्वये सदरचे दर कांही प्रमाणात कमी केलेले आहेत.

---

**कोल्हापूर शहरात पाणी अनधिकृतरित्या वापरले जात असल्याबाबत**

**(४२) १११७५३ (१८-०४-२०१८). श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर शहराला होणाऱ्या पाणीपुरवठयातील गळती सुमारे ६९ टक्के असून फक्त २९ टक्के पाण्याचेच बिलींग होते तर ०.८९ टक्के पाणी अनधिकृतरित्या वापरले जात असल्याचे वॉटर ऑडिटमधून नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या ऑडिटनुसार पाणी गळती रोखण्याकरीता तसेच अनधिकृतरित्या वापरले जाणारे पाण्यावर कायमस्वरुपी कोणत्या उपाययोजना केल्या आहेत किंवा करण्यात येणार आहेत,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०६-२०१८) :** (१) कोल्हापूर शहर पाणीपुरवठा योजनेच्या कामाकरीता सल्लागार कंपनीकडून प्राप्त झालेल्या जल लेखापरिक्षण (Water Audit) अहवालात अशा प्रकारची बाब नमुद आहे. तथापी, या बाबत फेरतपासणी व खातरजमा करुन फेर अहवाल सादर करण्याच्या सुचना संबधित सल्लागार संस्थेस महानगरपालिकेमार्फत देण्यात आले आहेत.
(२) विविध पंप व पाण्याच्या टाक्यामधून तसेच वितरण व्यवस्थेतील अन्य प्रकारे होणाऱ्या पाणी गळतीस रोखण्यासाठी कायमस्वरुपी उपाययोजना करण्यात येत आहे. यात प्रामुख्याने पाणी वितरण व्यवस्थेतील पाणी पुरवठ्याचा दाब, विविध वॉल्वचे देखभाल दुरुस्ती, मीटर देखभाल दुरुस्ती, गुणवत्तापुर्ण साहीत्याद्वारे जुने पाईपलाईन बदलणे, पाणीपुरवठ्याच्या कर्मचऱ्यांना पाणी नियोजनाच्या अनुषंगाने प्रशिक्षण व पाणी काटकसरीने वापराकरीता नागरीकांचे प्रबोधन अशा प्रकारचे उपाय कोल्हापूर महानगरपालिका राबवित आहे.

कोल्हापूर शहराच्या मंजूर अमृत योजनेंतर्गत पाण्याच्या टाक्याची दुरुस्ती, जुनी वितरण व्यवस्था व शुध्द जल, मुख्य वाहीनी अंशत: बदलणे इत्यादी कामांचा समावेश आहे. तसेच कोल्हापूर शहरास पाणीपुरवठा करण्याकरीता काळम्मावाडी धरण उद्भवातून पाणीपुरवठा योजनेचे काम हाती घेण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मौजे हिर्डोशी (ता.भोर, जि.पुणे) येथे आऊट पोस्ट पोलीस चौकी निरा देवघर धरणाच्या बुडीत क्षेत्रात गेल्याने चौकीचे कामकाज बंद झाले असल्याबाबत

**(४३) ११२१४० (११-०४-२०१८). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे हिर्डोशी (ता.भोर, जि.पुणे) येथे आऊट पोस्ट पोलीस चौकी निरा देवघर धरणाच्या बुडीत क्षेत्रात गेल्याने चौकीचे कामकाज बंद झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामुळे येथील दुर्गम व डोंगरी भागातील मौजे हिर्डोशी व त्या लगतच्या सुमारे २०-२५ गावांतील स्थानिक रहिवाशांना काही अंशी पर्यटकांकडून व चो-या, दरोडे, महिलांची छेडछाड याला विनाआधार सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, येथे पुन्हा सदरील आऊट पोस्ट पोलीस चौकी कार्यान्वित करावी यासाठी हिर्डोशी ग्रामसभेने ठराव करुन शासनास सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याठिकाणी भोर पोलीस स्टेशन अंकीत आऊट पोस्ट पोलीस चौकी हिर्डोशी येथे पूर्ववत सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०६-२०१८) :** (१) मौजे हिर्डोशी (ता.भोर, जि.पुणे) येथील पोलीस दुरक्षेत्र/ पोलीस चौकी निरा देवघर धरणाच्या बुडीत क्षेत्रात गेल्याने सद्यस्थितीत सदर पोलीस दुरक्षेत्र/पोलीस चौकीसाठी इमारत उपलब्ध नाही. तथापि सदर पोलीस दुरक्षेत्र/पोलीस चौकीचे कामकाज भोर पोलीस ठाण्यामधून चालविण्यात येत आहे. सदर भागातील कामकाज करण्यासाठी पोलीस कर्मचाऱ्यांची नेमणुक करण्यात आली आहे.
(२) सन २०१६ मध्ये चोरीचे ०२ व महिलांची छेडछाड याबाबत ०१ असे एकुण ०३ गुन्हे दाखल झाले असून सन २०१७ मध्ये व माहे २०१८ मध्ये चोरी, दरोडे व महिलांची छेडछाड असे प्रकार घडलेले नाहीत. हिर्डोशी व त्या लगतच्या परिसरामध्ये पोलीसांकडून सतर्कपणे ग्रस्त घालण्यात येत असल्याने गुन्ह्यांवर प्रतिबंध झालेला आहे.
(३) व (४) मौजे हिर्डोशी (ता.भोर, जि.पुणे) येथे पोलीस दुरक्षेत्र/पोलीस चौकी कार्यान्वित करणेबाबत हिर्डोशी ग्रामसभेने ठराव केला आहे. त्यानुसार सदर पोलीस दुरक्षेत्र/पोलीस चौकी पुर्ववत सुरु करण्याच्या अनुषंगाने पर्यायी जागेची व्यवस्था करण्याची कार्यवाही पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण व संबंधित पोलीस ठाणे यांच्या स्तरावरुन करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## "भौगोलिक माहिती प्रणाली" (जीआयएस) तंत्रज्ञानावर आधारित माहिती संकलित करण्यासाठी ठाणे येथील "सायबरटेक " या कंपनीची निविदा मंजूर केल्याबाबत

**(४४) ११२९०० (०४-०४-२०१८). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मालमत्ता सर्वेक्षणाच्या अनुषगान "भौगोलिक माहिती प्रणाली" (जीआयएस) तंत्रज्ञानावर आधारित माहिती संकलित करण्यासाठी सन २०१२ मध्ये ठाण्याच्या "सायबरटेक "या कंपनीची निविदा ग्राहय धरुन दीड कोटी रुपयांचे कंत्राट देण्यात आले असून त्याबाबत राबविण्यात आलेल्या निविदा प्रकियेत सदर कंपनी निकषात बसत नसली तरीही त्याच कंपनीला कंत्राट दिल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान सादर केलेल्या चौकशी अहवाल स्पष्ट करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या अहवालानुसार संबधित कंपनीवर तसेच संबधित दोषी अधिका-यांवर सनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे व याबाबतची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०६-२०१८) :** (१) होय.

(२) व (३) चौकशी अहवालाच्या आधारे, विषयांकित कामाचा महानगरपालिकेस उपयोग होईल अश्या पध्दतीने काम पूर्ण करुन द्यावे अथवा उक्त कामापोटी महानगरपालिकेतर्फे कंपनीस अदा करण्यात आलेली संपूर्ण रक्कम परत करावी अशी नोटीस दिनांक १६/०२/२०१८ रोजी संबंधीत कंपनीस देण्यात आलेली होती.

तथापि, कंपनीने यास कोणताही प्रतिसाद दिलेला नसल्याने, कंपनीबरोबर झालेल्या करारातील तरतुदीनुसार, प्रस्तुत प्रकरणी लवाद नियुक्त करण्याबाबत प्रशासकीय मान्यता झालेली असून, त्यानुसार पुढील कार्यवाही सुरु आहे.

निविदा प्रक्रियेच्या सुरुवातीपासून या कामाशी संबंधीत अधिकारी / कर्मचारी यांच्यावर जबाबदारी निश्चित करुन, त्यांच्याविरोधात विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

असे आयुक्त, अमरावती महानगरपालिका यांच्या अहवालात नमूद आहे.

---

**नवनिर्मित मुक्ताईनगर व बोदवड (जि.जळगांव) नगरपंचायतीच्या हद्दीतील वैशिष्ट्यपूर्ण कामांसाठी निधी मंजूर करण्याबाबत**

**(४५) ११३१८३ (१८-०४-२०१८). श्री.एकनाथराव खडसे (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवनिर्मित मुक्ताईनगर व बोदवड (जि.जळगांव) नगरपंचायतीच्या हद्दीतील वैशिष्ट्यपूर्ण कामांसाठी निधी मंजूर करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान मा.मुख्यमंत्र्यांना निवेदन देऊन मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने निधी मंजूरीबाबत संबंधित विभागाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) असल्यास, सदर कामांसाठी निधी किती कालावधीत उपलब्ध करुन देण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०६-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) शासन निर्णय क्र.ननपं-२०१८/प्र.क्र.१७/नवि-१६ अन्वये मुक्ताईनगर नगरपंचायतीस रु.५ कोटी अनुदान वितरीत करण्यात आले आहे. तसेच शासन निर्णय क्र.ननपं-२०१८/प्र.क्र.२८(३३)/नवि-१६ दिनांक २२ फेब्रुवारी,२०१८ अन्वये बोदधवड नगरपंचायतीस रु.२ कोटी अनुदान हे “नव्याने स्थापन केलेल्या नगरपंचायतीना नागरी सुविधा पुरविण्यासाठी सहाय्य” या योजनेअंतर्गत निधी वितरीत करण्यात आला आहे. सदरची कामे दिनांक ३१ मार्च,२०१९ पर्यत पुर्ण होणे अपेक्षित आहे.

(४) विलंब झालेला नाही.

---

## चिपळूण नगरपरिषदेने (जि.रत्नागिरी) भाजी मंडई इमारतीमधील व्यापारी गाळे वाटपाबाबत केलेली लिलाव प्रक्रिया चुकीची असल्याबाबत

**(४६) ११३३७० (१९-०४-२०१८). श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिपळूण नगरपरिषदेने (जि.रत्नागिरी) भाजी मंडई इमारतीमधील व्यापारी गाळे वाटपाबाबत केलेली लिलाव प्रक्रिया चुकीची असल्याच्या तक्रारी होत असून ती रद्द करणेबाबत स्थानिक नागरिकांनी जिल्हाधिकारी रत्नागिरी यांचेकडे नोटीसीद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर लिलाव प्रक्रियेमुळे नगरपरिषदेचे सुमारे ५ कोटीहून अधिक नुकसान होणार असल्याने या लिलाव प्रक्रीयेविरुध्द तक्रारी होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तदनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०६-२०१८) :** (१) चिपळूण नगरपरिषदेने (जि.रत्नागिरी) भाजी मंडई इमारतीमधील व्यापारी गाळे वाटपाबाबत केलेली लिलाव प्रक्रिया रद्द करण्याबाबत जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांच्याकडे नोटीशीद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे.

(२) व (३) अशा आशयाच्या तक्रारी जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांच्याकडे करण्यात आल्या आहेत, ही वस्तुस्थिती आहे.

तथापि, जिल्हाधिकारी, रत्नागिरी तथा मुल्यांकन समिती अध्यक्ष यांच्या समितीने मंजूरी दिल्यानुसार व मुख्यसभेत प्राप्त झालेल्या मंजुरी अन्वये भाजी मंडई इमारतीमधील व्यापारी गाळे ई-लिलाव प्रक्रीया पूर्ण करुन वाटप केल्याचे चिपळूण नगरपरिषदेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वडगांव (जि. कोल्हापूर) शहरातील यादव कॉलनीतील कचरा प्रकल्पाबाबत

**(४७) ११४०१७ (०३-०४-२०१८). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वडगांव शहरातील (जि.कोल्हापूर) यादव कॉलनीतील नगरपरिषद प्रशासनाकडून सुरु रण्यात येणा-या कचरा प्रकल्पाच्या विरोधात दिनांक ७ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास नागरिकांनी वडगांव नगरपरिषदेवर मूक मोर्चा काढला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी सादर केलेल्या निवेदनानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०६-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) नगरपरिषदेने वडगाव शहरातील यादव कॉलनीतील १०० ते १५० घरातील ओल्या कचऱ्यावर २ कर्मचाऱ्यांच्या सहाय्याने Bio decomposition culture वापरुन शास्त्रोक्त पध्दतीने प्रक्रिया करण्यात येणार असल्याचे नागरिकांना नगरपरिषदेने अवगत केले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अमरावती (जि.अमरावती) शहराला पाणीपुरवठा करणारी मुख्य जलवाहीनी फूटून शहराचा पाणी पुरवठा खंडित झाल्याबाबत

**(४८) ११५४२९ (१२-०४-२०१८). डॉ.सुनिल देशमुख (अमरावती) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती (जि.अमरावती) शहराला पाणीपुरवठा करणारी मुख्य जलवाहीनी माहे ऑक्टोबर पासून जानेवारी पर्यंत चार ते पाच वेळा फुटून पूर्ण शहराचा पाणी पुरवठा ३ ते ४ दिवसांपर्यंत खंडीत झाला होता या प्रकरणी दिनांक ३१ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास स्थानिक नागरीक व माजी नगरसेवक श्री. प्रमोद पांडे यांनी कार्यकारी अभियंता मजीप्रा यांना निवेदन दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक ०१ फेब्रुवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास या विषयाशी संबधित अधिक्षक अभियंता कार्यालय मजीप्रा,अमरावती येथे झालेल्या बैठकीमध्ये सदर जलवाहीनीवर अमृत अभियानाअंतर्गत सदोष एअर व्हॉल लावण्यात आल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर एअर व्हॉल पुरवतांना त्रयस्थ यंत्रणेमार्फत करण्यात येणाऱ्या परीक्षणात प्रत्यक्ष भेटीचा दिनांक व प्रमाणपत्र निर्गमित केल्याचा दिनांक यामध्ये तफावत असून मोठा गैरव्यवहार झालेला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदोष एअर व्हॉल पुरवठा प्रकरणी सदर कंत्राटदारांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०६-२०१८) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) दिनांक ०१/०२/२०१८ रोजी झालेल्या बैठकीत, एअर व्हॉल्व बाबत चर्चा झाली परंतु, सदरचे व्हॉल्व सदोष आहेत किंवा कसे याबाबत निष्कर्ष काढलेला नाही.

(३) त्रयस्थ यंत्रणेमार्फत करण्यात येणा-या परिक्षणात प्रत्यक्ष भेटीचा दिनांक व प्रमाणपत्र निर्गमित केल्याचा दिनांक यामध्ये तफावत असल्याचे अंशत: खरे आहे. तथापि, एअर व्हॉल्व सदोष असल्याचे निष्कर्ष काढण्यात आलेले नसल्याने गैरव्यवहार झाला असे म्हणता येणार नाही.

(४) व (५) एअर व्हॉल्व सदोष असल्याचे प्रमाणित झालेले नसल्याने कंत्राटदारावर तूर्त कार्यवाही करण्यात आलेली नाही.

तथापि, निविदेतील अटीनुसार सदर कंत्राटदारास या व्हॉल्व पोटी केवळ ६०% अदायगी करण्यात आली आहे व उर्वरित रक्कम रोखण्यात आलेली असल्याचे, आयुक्त, अमरावती महानगरपालिका यांच्या अहवालात नमूद आहे.

---

**मालेगाव (जि.वाशिम) शहराला चाकातीर्थ प्रकल्पावरुन कुरळा धरणात पाणी सोडण्याचा प्रश्न प्रलंबित असल्याबाबत**

**(४९) ११६००७ (१२-०४-२०१८). श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगाव (जि.वाशिम) शहराला चाकातीर्थ प्रकल्पावरुन कुरळा धरणात पाणी सोडण्याचा प्रश्न प्रलंबित असल्याने २५ हजारापेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या मालेगाव शहराचा पाणी टंचाईच्या प्रश्न गंभीर झाला असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मालेगाव शहराची पाणी टंचाईला प्रश्न सोडविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०६-२०१८) :** (१), (२) व (३) होय, अशी बाब निर्दशनास आली होती.

दरम्यान मालेगाव शहराकरिता चाकातिर्थ ते कुरळा धरणापर्यंत तातडीची पाणी पुरवठा योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, वाशिम यांच्यामार्फत सुरु करण्यात आली असून सध्या शहरास प्रति व्यक्ती २० लिटरप्रमाणे दररोज पाणी पुरवठा करण्यात येत आहे.

---

**घाटकोपर (मुंबई) येथील सिटिएस नं.१९४ अ ह्या भूभागावर क्रांतीज्योत गृहनिर्माण संस्थेच्या उर्वरित झोपडीधारकांना एसाआरअए योजनेत समाविष्ट करण्याबाबत**

**(५०) ११६११६ (०३-०४-२०१८). श्री.संजय कदम (दापोली) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घाटकोपर (मुंबई) येथील सिटिएस नं.१९४ अ ह्या भूभागावर क्रांतीज्योत गृहनिर्माण संस्थेच्या उर्वरित झोपडीधारकांना एसाआरअए योजनेतंर्गत समावेश करणे बंधनकारक असतानाही विकासक आणि उपजिल्हाधिकारी कार्यालय, घाटकोपर यांच्या संगनमताने त्यांना समाविष्ट करुन घेतले जात नसल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.गृहनिर्माण मंत्री यांनी दिनांक २१ सप्टेंबर, २०१७ रोजी एस.आर.ए. कार्यालयात बैठक घेऊन क्रांतीज्योत संस्थेमध्ये उर्वरित सुमारे १७३ झोपडीधारकांना या योजनेत समाविष्ट करण्याचे आदेश देऊनही तसेच याबाबत मुख्यमंत्री कार्यालयाकडून आदेश मिळूनही त्याची अद्याप अंमलबजावणी केलेली नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकल्पाचे विकासक आणि विभागाचे अधिकारी यांनी एकत्रित संगनमत करुन झोपडीधारकांना त्यांच्या घरापासुन वंचित ठेवले असल्याचे निदर्शनास येत असून सर्व झोपडीधारकांना योजनेत समावेश करत नाहीत तोपर्यंत विकासकास सीसी देणे अपेक्षित नसतानाही तो दिला गेला , हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यात काय निदर्शनास आले त्यानुसार उर्वरित सुमारे १७३ झोपडीधारकांना योजनेत समाविष्ट करण्याबाबत व दलालांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (१३-०६-२०१८) :** (१) व (२) हे खरे नाही. उपजिल्हाधिकारी (अति/निष्का) तथा सक्षम प्राधिकारी घाटकोपर कार्यालयाकडून क्रांतीज्योत गृहनिर्माण संस्थेचे अंतिम परिशिष्ट-II जाहीर नोटीसद्वारे दि.२३.४.२०१८ रोजी प्रसिध्द करण्यात आले आहे.

सक्षम प्राधिकारी यांनी दि.२७.०२.२०१८ रोजी प्रारुप परिशिष्ट-२ प्रसिध्द केलेले आहे.
(३) योजनेस दि.०४.१०.२०१६ रोजी आशयपत्र (LOI) व दि.१८.०५.२०१७ रोजी बांधकाम आरंभप्रमाणपत्र (C.C) हे दि.२७.०५.२००५ रोजीच्या मुळ परिशिष्ट-२ च्या आधारे व विकास नियंत्रण नियमावली ३३(१०) च्या तरतुदीच्या आधारे नियमानुसार देण्यात आलेले आहे असा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचा अहवाल आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

**मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर**
**मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.**